साप्ताहिक | चतुरस्त्र | परखड | रास्त | कर्तव्यदक्ष

# चपराक

• वर्ष : १८
• अंक : १८
• पाने : ८
पुणे


मूल्य ६/-

www.chaprak.com
भ्रमणध्वनी : ७०५७२९२०९२

'Industrial Efficiency Award' Winner

■ Pioneer in continuous vacuum pans
■ Manufacturer & supplier of turn-key boiling house
■ Refined sugar plants

For More Details Contact
INDIANA SUCRO-TECH (PUNE) PVT. LTD.



Madhav Chambers-1, Flat No. 7-8, Above Dena Bank, SB Road, Pune-411016.
WORKS : G-52. MIDC Ahilyanagar, 414111.
Laxmi Industrial estate, Hatkangale, 416109.
Tel.: 020-25660872 Fax: 020-25662593
Email : istppl1@gmail.com/ www.istppl.in

■ सोमवार, दि. २२ ते २८ जून २०२६ | संपादक : घनश्याम पाटील | कार्यकारी संपादक : प्रमोद येवले | RNI No. MAHMAR/2011/35979

**नारायण राणे हे एकेकाळचे कट्टर शिवसैनिक! एका मुलाखतीत विलासराव देशमुख यांना 'सर्वोत्तम प्रशासक' म्हटल्याने त्यांचे बाळासाहेब ठाकरे यांच्यासोबत काही मतभेद झाले आणि त्यांनी शिवसेना सोडली. 'बाळासाहेबांनी मला हाकलून दिलं' म्हणून ते सगळ्यांच्या समोर रडले. शिवसेनेत मुख्यमंत्री राहिलेल्या या नेत्याने काँग्रेसमध्ये प्रवेश केला. बारा वर्षे तिथे संसार केल्यावर त्यांनी सांगितलं, 'इथं माझी किंमत नाही.' दोन्ही विचारधारा अनुभवल्यानंतर त्यांनी काय करावं? स्वतःचाच पक्ष काढला. त्याचं नाव काय ठेवलं? 'महाराष्ट्र स्वाभिमान!' अपेक्षेप्रमाणे तो सहा महिन्यात बंद पडला. मग त्यांनी भाजपशी जवळीक केली. 'पक्षांतरबंदी' या विषयावर बोलताना एका आमदारानं त्यांना उपहासानं सांगितलं, ''राणे साहेब, तुम्ही तीन लग्न केलीत!'' त्यावर क्षणाचाही विलंब न करता राणे म्हणाले, ''हो! पण माझ्या तिन्ही बायका चांगल्या निघाल्या. त्यांच्याकडं मला मुख्यमंत्रीपद, मंत्रीपद आणि खासदारकी मिळाली.'' म्हणून त्यांना 'बंडखोरांचे बादशहा' म्हटलं जाऊ लागलं.**



# लोकशाहीचे वास्तव




**संपादकीय** | घनश्याम पाटील ७०५७२९२०९२

आपल्या पक्षातून कोणी दुसऱ्या पक्षात गेला तर तो गद्दार आणि दुसऱ्या पक्षातून कोणी आपल्याकडे आला तर ते त्याचं हृदयपरिवर्तन, असे म्हणायचे दिवस आले. कपडे बदलावेत तसे नेते राजकीय पक्ष बदलू लागले. विचारधारा, निष्ठा हे सगळं मातीमोल ठरलं. उरला तो फक्त स्वार्थ. ''सरकार कुणाचेही असू द्या, मी मंत्रीमंडळात असतोच,'' असं सांगणाऱ्या रामदास आठवल्यांचं कुणाला वाईट वाटत नाही. त्यांनी केलेली तडजोड आणि प्रामाणिकपणे दिलेली कबुली हाही कौतुकाचा विषय झाला.

१९९९ साली 'विदेशीबाई पंतप्रधानपदी नको,' म्हणून शरद पवारांनी काँग्रेसमध्ये बंड केलं. पक्षातून त्यांची हकालपट्टी करण्यात आली. शरद पवार, तारिक अन्वर आणि पी. ए. संगमा यांनी एकत्र येत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना केली. 'अमर, अकबर, ॲन्थोनी' म्हणत माध्यमांनी त्यांची दखल घेतली. ज्या सोनिया गांधी यांना 'विदेशी' म्हणत पवारांनी बंड पुकारलं, त्याच काँग्रेसच्या ताटाखालचे मांजर बनत त्यांनी केंद्रीय कृषी मंत्रपद स्वीकारलं. दिवस इतके बदलले की पुढे ते सोनिया गांधी यांचे जवळपास सल्लागारच झाले. कोणत्याही बंडातून स्वार्थ साधता येतो, सत्तेचा वाटेकरी होता येतं हे आजवर अनेकदा, अनेकांनी कृतितून दाखवून दिलं आहे.

एका नेत्याला विचारलं, ''तुम्ही रातोरात पक्ष कसा बदलला?''

ते म्हणाले, ''आम्ही एका लग्नाला गेलो होतो. तिथं आमची चर्चा झाली. आमच्या खूप गप्पा रंगल्या. त्यातून आमचे विचार जुळले आणि आम्ही एकत्र यायचा निर्णय घेतला.''

''मग ते लग्न टिकलं की मोडलं?'' या प्रश्नावर ते म्हणाले, ''पक्षांचं लग्न जुळलं. सत्तेचा वाटा मिळाला. आम्ही दोघेही खूश आहोत.''

रामायणातली एक कथा सांगितली जाते. राम-रावण युद्धाची! देवी सीतेला रावणाच्या तावडीतून सोडवायचं, म्हणून रामानं सेना तयार केली. अनेक पराक्रमी वानर त्यांच्या सोबत होते. युद्ध पुकारलं गेलं. प्रत्यक्षात ते सुरू झालं. सर्व देवदेवता स्वर्गातून हे घनघोर युद्ध बघत होत्या. त्यांच्या हातात फुलांच्या टोपल्या होत्या. त्यातून कुणावर पुष्पवृष्टी करावं हे मात्र त्यांना ठरवता येत नव्हतं. जर रामावर फुले टाकली आणि रावण जिंकला तर? किंवा रावणावर फुले उधळली आणि प्रभू श्रीराम विजयी ठरले तर...? ८४ दिवस हे युद्ध सुरू होते आणि प्रभू श्रीराम जिंकणार याचा अंदाज देव-देवतांना आला. मग त्यांनी रामावर पुष्पवृष्टी करत त्यांचे गुण गायला सुरूवात केली. ८५व्या दिवशी रामाने रावणाचा वध केला आणि हे युद्ध संपले. म्हणजे देव-देवतासुद्धा कुणाची 'जिंकण्याची शक्यता' आहे हे पाहून कुणाला साथ द्यायची याचा निर्णय घेत असतील तर मग आजच्या नेत्यांच्या बदलत्या भूमिकांचे आश्चर्य वाटायला नको. जिथे स्वार्थ साधता येईल तिथे ते जाणारच! मग कुणी आईबाबाची शपथ घेत असेल नाही तर साईबाबाची! त्यांना फक्त सत्ता, पद, प्रतिष्ठा इतकेच दिसणार. जिथं मलिदा अधिक तिथं साहेबांचं बस्तान. मतदारांना काय वाटेल, ज्यांनी त्यांचे विचार, पक्ष, भूमिका बघून मतदार दिले ते काय म्हणतील याच्याशी त्यांना घेणं-देणं नसतं.

शरद पवारांनी वसंतदादांच्या पाठित खंजीर खुपसला. काँग्रेसला फाट्यावर मारत राष्ट्रवादीची स्थापना केली. छगन भुजबळ शिवसेनेचे नगरसेवक झाले, आमदार झाले. ते सेनेतून बाहेर पडले. नारायण राणे फुटले. 'नारायण आमचाच' असं 'सामना'चं मुख्य शीर्षक करत ज्या बाळासाहेबांनी राणेंवर विश्वास दाखवला ते राणे काँग्रेसमध्ये गेले. राज ठाकरे यांनी शिवसेनेला जय महाराष्ट्र करत महाराष्ट्र निवनिर्माण सेनेची स्थापना केली. ज्या विचारधारेच्या विरूद्ध बाळासाहेबांनी आयुष्यभर संघर्ष केला, त्यांना बरोबर घेत, त्यांच्याच मदतीने उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्रीपद मिळवले. एकनाथ शिंदे यांनी बंडखोरी करत शिवसेनेला भगदाड पाडले. त्यातून ते मुख्यमंत्री झाले. त्यांच्यापासून प्रेरणा घेत 'गुरूची विद्या गुरूला' हे दाखवून देत स्वर्गीय अजित पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष फोडला. त्यांचा पहाटेचा शपथविधी महाराष्ट्राने बघितला. 'औट घटकेचा राजा' काय असतो ते दिसून आले. 'जो घायल है ओ घातक है' हे पुन्हा एकदा दिसून आले आणि दादांनी भाजपसोबत संसार थाटला.

मागे राज ठाकरे एकदा म्हणाले होते की, 'भाजपला देशात एकही प्रादेशिक पक्ष शिल्लक ठेवायचा नाही.' त्या दृष्टिने भाजपने देशभर ज्या तडजोडी केल्या, ज्या पद्धतीने सत्ता हस्तगत केली, प्रादेशिक पक्षांची धूळधाण उडवली ते पाहता राज यांचे म्हणणे तंतोतंत खरे ठरल्याचे दिसून येते. या सगळ्याला पर्याय काय? विरोधी पक्ष सक्षम नसणं, विकाऊ माणसांची फौज दिमतीला असणं, विचारधारा, ध्येय, मूल्य संपुष्टात येणं यातून दुसरं काय घडणार? शरद पवार नेहमी म्हणतात की, 'आम्ही राजकारणी आहोत, संत नाही. मग संतासारख्या विरक्तीच्या भावनांची अपेक्षा आमच्याकडून का ठेवता?' पवारांनी त्यांच्या अनेक कारनाम्यांच्या बचावासाठी हा जो प्रतिप्रश्न सामान्य माणसाला केला होता त्याच्या मुळाशी गेल्यावर अनेक प्रश्नांची उत्तरे आपल्याला सहजपणे मिळतील.

महाराष्ट्रात सगळं काही सुरळीत सुरू असतानाच पुन्हा एकदा एकनाथ शिंदे यांनी स्फोट घडवला आणि शिवसेनेचे सहा खासदार फोडले. 'सत्तेत नसल्याने आमची कामे होत नाहीत, आम्हाला पुरेसा निधी मिळत नाही' असे त्यांचे म्हणणे आहे. आपल्या मतदारसंघाचा विकास व्हावा म्हणून आपण हा निर्णय नाईलाजाने घेतल्याचे ते सांगतात. रावणाची लंका सोन्याची आणि रामाची अयोध्या मातीची! म्हणजे लंकेचा विकास जोरात झाला होता आणि रामराज्य

पान २ वर ▶▶

# अनपेक्षिततेत अपेक्षितता



संजय सोनवणी
साहित्यिक आणि संशोधक
७७२१८७०७६४

**जगाचा इतिहास जसा कल्पक शोध लावून मानवी जीवन सुसह्य करणाऱ्यांनी भरला आहे त्यापेक्षा जास्त जगाचा इतिहास मानवी मूर्खपणामुळे झालेल्या युद्धांनी आणि मानवी संहाराने भरलेला आहे. आताचे इराण-इझ्राएल-अमेरिका आणि इतर आखाती देश यात झालेले आणि विराम घेतला असला तरी तो किती काळ टिकेल आणि पुढेही अजून किती काळ हे युद्ध चालू राहील हे खुद्द ट्रम्प, नेतान्याहू किंवा मोजतबा खामेनेईलाही माहीत नसलेले युद्ध किती काळ अजून पुढे चालेल, युक्रेन-रशिया युद्धाचे शेवटी काय होणार हे पुतीन किवा झेलेन्स्की सांगू शकतील असेही नाही पण सर्व जगाच्या नाड्या आवळल्या गेलेल्या आहेत हे तर उघड आहे.**

सारीच राष्ट्रे या ना त्या प्रकारे ओढग्रस्तीला आली आहेत हे एक वास्तव आहे. म्हणजे ही युद्धे थांबू शकत नाहीत असे नाही पण सध्या जे जागतिक नेते आहेत तेच मुळात युद्धखोर आणि दंडेलशाही करण्यासाठी प्रसिद्ध असल्याने ते काही न काही कारण देत एक दिवस युद्ध थांबल्याची घोषणा करतात आणि ही घोषणा विरते न विरते तोच युद्ध पुन्हा सुरु झालेले असते. जगाने उसंतीचा घेतलेला श्वास पुन्हा अनियमित होतो. या युद्धखोरीच्या नादात आपण पृथ्वीवासीयांच्या भविष्याशी आणि जीविताशी खेळतो आहोत याची त्यांना जाणीव होत नाही पण आर्थिक सत्ता टिकवण्यासाठी, स्वत:ची व्यक्तिगत मत्ता वाढवण्यासाठी हे खेळ केले जातात हे आपल्याला या युद्धामुळे समजले असेल.

यामुळे खरे मानवी प्रश्न चर्चेच्या भोवऱ्यातून बाहेर पडले आहेत. मानवी जीवन अत्याधुनिक ए.आय. आणि रोबोटिक्सच्या तंत्रज्ञानाने झाकोळले गेले आणि बव्हंशी मानवी हातांना शारीरिक किंवा बौद्धिक श्रमाचे कामच उरले नाही तर एकुणातील व्यवस्था कशी ढासळेल यावर या दशकात सुरु झालेली चर्चा बऱ्यापैकी मागे पडलेली आहे. किंबहुना आजची युद्धेच हे तंत्रज्ञान वापरून खेळली जात असल्याने या भस्मासुराला पायबंद कसा घालावा याचा विचार कोण करणार? या तंत्रज्ञानासोबतच जगावे लागेल असे आता तत्त्वज्ञही सांगू लागलेले आहेत. भविष्यात आज आपण कल्पना करूही शकत नसलेली नवीन कामे निर्माण होतील आणि एकुणातील मानवी व्यवस्था आधी थोडी अव्यवस्थित होऊन नव्या व्यवस्थेशी जुळवून घेत एका वेगळ्या व्यवस्थेत जगू लागतील अशी कोठे तरी क्षीण का होईना आशा असली तरी नवीन जग केवळ तंत्रज्ञानाने बदलत नसून ते मानवी नैतिक मूल्यांचा घास घेत त्याला समूळ बदलवत आहे हे आपल्या लक्षात येईल. किंबहुना नवीन मूल्येच अशा झपाट्याने बदलत आहेत की आजवर माहीत असलेल्या पण सार्वजनिकरित्या उद्‌गारही न करता येईल अशा गोष्टी सर्वांना अगदी सहज वाटत आहेत. कोणाला आश्चर्य वाटत नाही आणि वाटावे असे कारणही नाही.

उलट मानवी प्रवृत्ती म्हणजे लालसा, लोभ, मक्तेदारीची भावना इ. दुर्गुणांचा सर्वत्र विस्फोट होत असताना आपल्याला दिसेल. भारतात म्हणावे तर राजरोसपणे मक्तेदारीकडे जात छोटे-मध्यम उद्योग संपवण्याची वाटचाल वेगाने सुरु आहे. मी 'भविष्य नावाचा इतिहासात' या माझ्या पुस्तकात जी भविष्यातील जागतिक मक्तेदारीच्या दिशेने जाणाऱ्या जगाची अवस्था वर्णन केली होती ती आताच प्रत्यक्षात येताना दिसत आहे. त्यात जगभरची सरकारे अतिश्रीमंतांच्या व शक्तिशाली समूहांच्या कच्छपी लागली असल्याने सारीच भू-सामाजिक स्थितीही वेगाने बदलू लागलेली आहे. राजकीय व्यवस्थेचे काय होते आहे हे आपण जगभरात पाहू शकतो.

मानवी समाजाच्या जीवनातील अनिश्चितता, अनिश्चिततेचे तत्त्व जसे सूक्ष्मयामिकी शास्त्राला कवटाळून बसले आहे त्याहीपेक्षा या तत्त्वाने आदिम कालापासून मानवी जीवनाला जास्त ग्रासून टाकले असले तरी तेव्हाचा वेग फार संथ होता. इतका की काही बदलते आहे याची जाणीव व्हायलाही अनेक पिढ्या जाव्या लागायच्या.

आज अनिश्चिततेच्या हेलकाव्यांवर आपले जीवन प्रती-क्षणी झुलत असते. पुढच्या क्षणी काय होईल याचे भाकीत अगदी योजनाबद्ध कृती केली तरीही वर्तवता येणे अशक्य असते. मुळात जीही काही कृती केली ती जे परिणाम घडवले ती स्थितीच अनिश्चित आणि प्रतिक्षणी बदलणारी असते. त्यामुळे परिणामही वेगवेगळी रुपे घेतात आणि अपेक्षित रूपे मात्र कवेत येतच नाहीत. काही वेळा कृतीचे अपेक्षित परिणाम दिसतात हे खरे असले तरी ते अपेक्षित परिणाम पुन्हा अनपेक्षित शक्यतांना जन्म देतात हेही आपल्या अनुभवाला येत असते. अनपेक्षिततेत अपेक्षितता आणायचा प्रयत्न असतो आणि कोणती तरी शक्ती अपेक्षित असेच घडवू शकेल या अपेक्षेतून डावाला लावले जाते ते मानवी जीवन आणि सध्याच्या युद्धातून तेच प्रकर्षाने जाणवते आहे.



जगाची झालेली आर्थिक नाकेबंदी, युद्धात झालेला विध्वंस ही भांडवलदारांसाठी मोठी संधीच असते कारण ते त्यातून पुन्हा निर्माणकार्ये/दुरुस्त्या यात पैसेच कमावणार असतात. लोकांना रोजगार काही ना काही प्रमाणात मिळणारच असल्याने त्यांनाही ही एक संधी बनून जाते पण ही संधी ज्याचा विनाश झाला आहे त्यालाच मिळते असे नाही. हे विषम वाटप असते. युद्धात सहभागी राष्ट्रे नंतर त्यांच्यात लाभांचे वाटप करतात तसेच ज्यांचे नुकसान झाले आहे ते त्यातून सावरण्यासाठी प्रती-दहशतवादाचाही वापर करू शकतात. येत्या काही वर्षात न्युयॉर्कमधील वर्ल्ड ट्रेड सेंटरवर जसा हल्ला झाला तसाच हल्ला पुन्हा केला जाऊ शकणार नाही असे नाही. जगात आमचीच दादागिरी चालेल असा अनैतिक दावा कोणतेही राष्ट्र करू शकत नाही पण सध्याच्या जगातील युद्धात पुतीन, नेतान्याहू आणि ट्रम्प यांची दादागिरी नव्हती असे नाही. याचा अर्थ अयातोल्ला खामेनेई किंवा झेलेन्स्की शहाजोग होते असाही होत नाही. हमासही आपली जबाबदारी टाळू शकत नाही. प्रत्येकाकडे आपापला तर्क आणि कारण आहे. व्यूहनीतीही आहे परंतु या काही लोकांच्या अहंकारासाठी जेव्हा जगच वेठीला धरले जात असेल तर आम्ही तंत्रज्ञानाने कितीही प्रगत झालो असलो तरी आमची मानवी बुद्धी मात्र सडत चालली आहे असे म्हणावे लागेल.

उद्याचे जागतिक परिप्रेक्ष आणि एकुणातील राजकीय यंत्रणा आपल्या भूमिका कशा आणि कशासाठी बदलतील हेच कळेनासे झाले आहे. ट्रम्पबाबत म्हणतात की या गृहस्थाला आपल्याला नेमके काय साध्य करायचे आहे हे तरी समजते की नाही हे त्यालाच ठाऊक. सर्वच नेत्यांची ही अवस्था आहे आणि त्यात जागतिक मानवी समूदायाची फरफट होत आहे. हे कोठे तरी जगालाच थांबवावे लागेल.

'सारे काही फायद्यासाठी' ही आपली जी जागतिक प्रवृत्ती बनली आहे. तीच मुळात विघातक आहे. भौतिक फायदा की बौद्धिक/आत्मिक फायदा यात आपल्याला निवड करत एक संतुलन साधण्यासाठी प्रयत्न करावे लागणार आहेत. ते जर केले नाही तर मनुष्याला कोणीही वाचवू शकणार नाही. म्हणजे मनुष्य असेल पण मनुष्यपण हरवलेला. तसे होऊ नये म्हणून जागृत होण्याची गरज आहे. ■■

---

# लोकशाहीचे वास्तव

◀◀ पान १ वरून

गरीब राहिले, असे त्यांना सूचवायचे असेल. मग रावणाला साथ देणे, त्याच्या पाठिशी उभे राहणे हे त्यांना त्यांचे कर्तव्यच वाटणे स्वाभाविक आहे. याचा अर्थ हे खासदार जिथून फुटलेत तिथं रामराज्य आहे, असा मुळीच नाही. सध्याच्या काळात राम आणि रावण सारखेच झालेत आणि दोघांचेही राज्य मातीमोल आहे, एवढेच खरे!

१९९८-९९ साली शरद पवार यांनी सोनिया गांधी यांना पाच पानांचं पत्र लिहिलं होतं. त्यात ते म्हणाले होते, 'आपण जन्माने परदेशी असल्याने विरोधकांना मुद्दा मिळेल. त्यामुळे काँग्रेसचे अध्यक्षपद स्वीकारू नये.'

त्या पत्रानंतर सोनिया गांधी यांनी सभेत सांगितलं, ''जर माझ्यामुळे पक्ष फुटत असेल तर मी राजीनामा देते!''

त्यावर एकदम शांतता पसरली आणि अचानक घोषणा सुरू झाल्या, 'सोनिया गांधी जिंदाबाद!'

दुसऱ्या दिवशी वृत्तपत्रांनी मथळा केला, 'सानियांच्या अश्रुंनी पवारांना एकटं पाडलं.'

आजही हेच सुरू आहे. उद्धव बाळासाहेब ठाकरे म्हणाले, ''मी तुम्हाला नको असेल, तर माझा शिवसेनाप्रमुख पदाचा राजीनामा देतो. आपल्या कोणत्याही सामान्य शिवसैनिकाला या पदावर बसवा.'' लगेच सैनिकांनी रडारड केली. उद्धव ठाकरे यांच्या नावाच्या घोषणा दिल्या गेल्या. एका कवीनं सांगितलं, ''कांबळे कण्हतो पण रडत नाही.''

याचा अर्थ काय? काळ कोणताही असू द्या. राज्य कुणाचेही असू द्या. विरोधक कुणीही असू द्या. राजकारणात सगळ्यात महत्त्वाचं काय ठरतं तर तो स्वार्थ! तो स्वार्थ साधण्यासाठी ही राजकीय जमात काहीही करू शकते आणि आपण फक्त त्यांच्या सुरस, रम्य कथांची चर्चा करत राहतो. लोकशाही व्यवस्थेत सामान्य माणसाच्या हाती इतकेच आहे.

'चपराक' हे साप्ताहिक मालक, मुद्रक व प्रकाशक घनश्याम वसंतराव पाटील यांनी दै. सामना प्रेस सिंहगड रोड, वडगाव खुर्द, पुणे ४११०४१ येथे छापून चपराक प्रकाशन, ४०२, चौथा मजला, वेलस्प्रिंग, बावधन मार्केट यार्ड, बावधन बुद्रुक, पुणे ४११०२१ येथे प्रसिद्ध केले. संपादक : घनश्याम वसंतराव पाटील. (अंकातील मजकुराशी संपादक कदाचित सहमत असतीलही; वाद-विवाद पुणे न्यायालयीन कक्षेत.) भ्रमणध्वनी : ७०५७२९२०९२/८७६७९४१८५०. ई मेल : info@chaprak.com

# व्यवस्थेला फोडी घाम; फक्त एक तुकाराम!




जनार्दन देवरे
मनमाड
९०११६९४८८५




## मसाला पान



(फाकडोजी महाराज प्रसन्न मुद्रेने सिंहासनावर बसले आहेत. समोर सर्व दरबारी आसनस्थ झाले आहेत. तेवढ्यात सेवक दरबारात प्रवेशतो.)

**सेवक –** महाराज, जय हो! विजय हो...! अभिनंदन! अभिनंदन महाराज! एक आनंदवार्ता आहे.

**महाराज –** काय? आज एकदम आनंदवार्ता?

(हे ऐकून दरबारातील सारेच मंत्री, प्रधानजी इ. आश्यर्याने सेवकाकडे पाहत.)

**एक मंत्री –** काय? आनंदवार्ता! व्वाह! जय हो! विजय हो! सांग लवकर! आणि तुला कसे कळले? डी.ए. वाढणार आहे की यंदा लवकर वेतनवाढ मिळणार आहे? की पेट्रोल स्वस्त झालंय?

**महाराज –** शांत राहा! शांतता पाळा. इन्क्रिमेन्ट, डी.ए.वाढ आणि पेट्रोल-डिझेलचे कमी होणारे भाव याशिवाय दुसरी काही आनंदवार्ताच नाही का हो तुमच्या लेखी?

(सारे दरबारी हिरमुसले होतात.)

**एक उपसचिव (चाचरतच) –** काय करणार महाराज, आम्हा चाकरांची तेवढीच अपेक्षा सरकारी कर्मचारी म्हणजे....!

**महाराज –** म्हणजे बिन्जे जाऊ द्या आता. शांत बसा. नुसते पगारवाढीचे फालतू विचार!

**प्रधानजी –** (मंत्र्याकडे व उपसचिवांकडे तुच्छतेने पाहत) नाही तर काय महाराज! लायकी नाय अन् आरशात पाहय...! असं आहे हे.

**महाराज –** सांग सेवका! काय झाले? दिल्लीश्वरांनी आमच्या अभिनंदनाचा ठराव पास केला की आपल्या प्रांतास प्रोत्साहनपर काही अधिकचे अनुदान प्रदान केले जाणार आहे.

**सेवक –** तसं काही नाही महाराज!

(सेवक तबकातून एक पान महाराजांना देत) आधी हे तुमचं मसाला पान घ्या अन् मग ऐका. (महाराज पान तोंडात टाकून प्रसन्न होत हसतात.) त्याच काय आहे महाराज की, प्रांतातील भेसळ यंत्रणा आता पार उद्ध्वस्त झालीय. अन्न व प्रशासन विभागाने सारे पार जाम केलेत हो. दुधवाले, पनीरवाले, औषध विक्रेते एकदम ताळ्यावर आलेत. गुटखा तर गायबच झालाय शहरा-शहरातून. शिवाय पॅकेजिंग फूडवाले वगैरे तर पार भेदरूनच गेलेत म्हणे! पण यामुळे पब्लिक जाम खूश.

किती वर्षांपासून आपण भेसळयुक्त अन्न आणि औषधे घेतोय याची जाणीवच त्या विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे साहेबांनी पब्लिकला करून दिली. शुद्धीकरण मोहीमच सुरु झालीय प्रांतात. त्यामुळे साऱ्यांनी पार डोक्यावर घेतलंय मुंढे साहेबांना आणि तुम्हालाही! लोक धन्यवाद देताहेत, अभिनंदन तुमचं, सोशियल मीडियावर तर फुल्ल हीच चर्चा चाललीये सध्या...!

**प्रधानजी –** म्हणजे? एकवीस वर्षात पंचवीस बदल्या करूनही हा गृहस्थ?

**सेवक –** एकदम ठाम! काम म्हणजे काम. प्रामाणिकपणा आणि जनतेच्या सेवेची तळमळ तिळभरही कमी झाली नाही. पार घाम फोडलाय सिस्टिमला.

**एक उपमंत्री –** नाही तर काय! असे बहादुर आणि नीडर अधिकारी हवेत सर्वच खात्यात. मग बघा सारे कसे सुतासारखे सरळ होतील.

**महाराज –** अहो, पण त्यांच्यासारखे प्रामाणिक आणि निष्ठावान अधिकारी हाताच्या बोटावर मोजण्याइतके तरी आहेत का हल्ली? हे असले तुकाराम विरळच!

**प्रधानजी –** विरळ नव्हे दुर्मीळच! म्हणून तर राज्यकारभार चालवताना आम्ही बदनामीचे धनी ठरतो...!

**महाराज –** यात अर्थात आपलाही दोष आहेच प्रधानजी. नेहमी आपली निवड चुकते, हितसंबंधांमुळे साऱ्याच गोष्टींना मुरड घालावी लागते. बरोबर ना? शिवाय अप्रत्यक्ष हस्तक्षेप आहेच की प्रधानजी?

**प्रधानजी –** तसं नव्हे महाराज पण पब्लिकलाही चांगले अधिकारी बोचतात. मग नाईलाज होतो महाराज.

**सेवक –** अन्? लोकप्रतिनिधी वगैरैना टोचतात! बरोबर ना?

**प्रधानजी –** सेवका, अरे असा मध्ये-मध्ये नको बोलूस. तुझं बोलणं म्हणजे टोमण्यावर टोमणे अन् अवघड जागेचे दुखणे!

**महाराज –** अहो बोलू द्या त्याला प्रधानजी. विश्वासू चाकर नव्हे तर गेल्या वीस वर्षांपासून आमचा मित्रच झालाय तो आता आणि सामान्य माणसाचा एक जाणकार प्रतिनिधी म्हणूनच आम्ही त्याच्याकडे पाहतो.

(प्रधानजी व इतर दरबारींचे चेहरे पडतात.)

आणि तुकारामांचं म्हणाल तर ते नडतातच व्यवस्थेला. १६ व्या शतकात संत तुकाराम बोल्होबा मोरे नडले आता हे तुकाराम मुंढे भिडताहेत...! व्यवस्था बदलू पाहणारी अशी माणसं आपलं एक युग निर्माण करतात अन् गाजवतातच. त्यांना पाण्यात पाहणारे खलनायक असणारच. त्याशिवाय त्यांचं नायकत्व कसं सिद्ध होणार?

**एकमंत्री –** हो ना महाराज, मला तर त्या नायक सिनेम तल्या अनिल कपूरचीच आठवण येते बघा.

**सेवक –** हे समंद ऐकून एक अभंगच आठवला बघा महाराज मला. संत तुकारामांचा. म्हणू का?

**महाराज –** अरे म्हण की! अभंग म्हणायला काय परवानगी लागते का काय कोणाची? बोल.

**सेवक** (गाण्याचा प्रयत्न करीत) –

**पापाचिये मुळे । झाले सत्याचे वाटोळे ।**
**दोष झाले बळीवंत । नाही ऐसी झाली नीत ॥**

**महाराज –** व्वाह! किती छान सांगितलंय महाराजांनी. बघा प्रधानजी असा आहे अभ्यास आमच्या लाडक्या सेवकाचा.

**प्रधानजी** ( ऐकू येईल असं पण पुटपुटत) –

त्यात काय एवढं, सतत गुगलवर तर पडलेला असतो तो, नाही तर तुमच्या मागे-पुढे..., फिल्डवर जाऊन बघ म्हणावं एकदा!

**महाराज –** काही म्हणालात का प्रधानजी? आणि ते फिल्डचं काय? शेवटचं वाक्य जरा ऐकू आलंय हं आम्हाला!

**प्रधानजी** (जरा गडबडतच) – नाही! तसं काही नाही महाराज पण आज जरा फिल्ड विजिट्स करायच्या होत्या. म्हटलं तेव्हा जरा लवकर दरबार आटोपला तर...! (तेवढ्यात दरबाराबाहेर कसल्या तरी गडबडीचा आवाज ऐकू येतो.)

**महाराज –** सेवका, काय हे? कसला गोंधळ चाललाय बाहेर बघ बरं!

**एक मंत्री –** आले वाटत ते! पण एवढ्या लवकर?

(मंत्र्याकडे पाहत) महाराज – कुणी येणार होतं का आज? तुम्हाला माहीत होतं म्हणजे! बोलला का नाहीत आपण? काय प्रकरण आहे हे?

**मंत्री –** काही नाही महाराज ते आपलं...!

**सेवक –** महाराज ते औषध कंपनीवाल्यांची एक संघटना आहे. तिचे प्रतिनिधी, काय ते सरचिटणीस का काय म्हणतात त्यांना आपली भेट घ्यायचीचे अर्जण्टमध्ये. सोबत आणखी पनीर निर्माता संघाचे कार्याध्यक्ष अन् पॅकेजिंग फुड इंडस्ट्रीचे एम.डी. वगैरेही आलेत. आधी महाराजांना कोण भेटणार यावरून गोंधळ चालला होता त्यांचा. परवानगी वगैरे नसल्याने द्वारपाल काही त्यांना आत सोडत नव्हते. तर ते म्हणत होते की दरबारी कामकाज मंत्र्यांशी त्यांचं बोलणं झालंय. त्यांनीच वेळ दिलीय. काय करू? आपली परवानगी असेल तर बोलावू का एकेकाला?

### वेलची

**वेलची – विचारिली वाट । उसंत सीतळ ।**
**बुद्धीपुढे बळ । तृणतुल्य ॥ – संत तुकाराम**

(महाराज दरबारी कामकाज मंत्र्यांकडे प्रश्नार्थक मुद्रेने पाहतात तर प्रधानजी व मंत्री मनगटावरील घड्याळाकडे बघत चेहऱ्यावर चिंता दर्शवित आहेत)

**महाराज –** एकेक नको. सारे एकाच वेळी बोलवा. म्हणजे वेळ जाणार नाही.

**द. का. मंत्री –** बरोबर आहे. शेवटी त्यांचं म्हणणंही ऐकायला हवंच कारण त्यांच्यामुळेच तर आपली सरकारी तिजोरी सदा बहरलेली असते. त्यांचे प्रश्नही आपण जाणून सोडवायला हवेतच. शेवटी प्रांताच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहेत. त्यांच्याकडील टॅक्सवरच तर जनकल्याण चालतंय महाराज.

**उपसचिव –** अगदी बरोबर बोलताहेत मंत्री महोदय! जय हो! विजय हो!!

(सेवक मंत्र्यांकडे पाहत हसतच बाहेर जातो.)

**महाराज –** आता आलंय हं सारं आमच्या लक्षात मंत्रीमहोदय, म्हणजे तुम्हीच इकडची अपॉइंटमेंट दिलीय तर! वर साळसूदपणाचा आव! बघा, बघा प्रधानजी आपल्या मंत्र्यांचं डबल स्टॅण्डर्ड वागणं, दोन्हीकडून ढोलकी वाजवायची.

(द. का. मंत्री व अन्य मंत्री माना खाली घालतात. प्रधानजी गालात हसतात.)

**प्रधानजी –** खरं सांगू का महाराज?

**महाराज –** सांगा, सांगा ना!

(सेवक बाहेर आलेल्या मंडळींचं शिष्टमंडळ घेऊन दरबारात प्रवेशतो.)

**सर्व शिष्टमंडळ प्रतिनिधी –** महाराज जय हो! विजय हो! फार मोठं संकट आलंय हो, आम्ही व्यवसाय करायचा तरी कसा? पार कंबरडं मोडलंय हो...!

**महाराज** (काहीच माहीत नसल्याचा आव आणित) – काय झालं? कसलं संकट आलंय?

**एक शि. मं. प्रतिनिधी –** महाराज सारख्या धाडी पडताहेत हो दुकानांवर, माल जप्त काय केला जातोय. बंदोबस्त काय, चौकशा काय अन् पोलीस केसेस काय? सारंच कठीण होऊन बसलंय बघा.

**दुसरा शि.मं. प्रतिनिधी –** आमच्या मेडीकलवाल्यांचं तर फारच कठीण झालंय हो! सारं टाय-अपच गणितच फिस्कटलयं. करावे तरी काय?

**तिसरा प्रतिनिधी** (अगदी गहिवरून) – आम्हा दुधवाल्यांचं तर दुधचं फाटलंय पार! गुजरात, राजस्थानचा खवा येणंच बंद झालंय! दुधपावडरच्या तर गोण्याच जाळाव्या लागल्या महाराज घाटात नेऊन!

**महाराज –** ते गुटखा किंगचे डायरेक्टर आणि तो केसरमय विमलयुक्त हिरा वगैर नाही आले का?

**एक प्रतिनिधी –** नाही महाराज. त्यांची तर बोबडीच वळाली हो! त्यांनी ई-मेल पाठवलाय आपल्या मंत्रिम होदयांना! ते जाम विवंचनेत आहेत. कोट्यवधींचा माल अण्डरग्राऊंड केलाय त्यांनी कसातरी!

**महाराज –** बरं, बरं! ठीक आहे. थांबा! आलोच.

(महाराज सेवकास घेऊन बाजूला जातात आणि हळू आवाजात बोलतात. सारे त्या दोघांकडे टक लावून पाहतात.)

पान ५ वर ▶▶

# तंत्रज्ञानाची जोड की फसवणुकीचे जाळे?

## डिजिटल व्यवहारात घाई आणि मोह टाळा, कष्टाचा पैसा सुरक्षित ठेवा



श्रीराम नानल
सातारा
९६३७१३३२८०

आजच्या वेगवान युगात डिजिटल पेमेंट आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग बनले आहे. भाजीवाल्यापासून ते किराणा दुकानदारापर्यंत सगळीकडे मोबाईलद्वारे पैसे देणे सोपे झाले आहे. हातातील मोबाईलमुळे बँकिंग व्यवहार सेकंदांत पूर्ण होतात, ही सोय जितकी मोठी आहे, तितकाच त्यामागे लपलेला धोकाही गंभीर आहे. विशेषतः कष्टकरी कामगार आणि बचत गटांच्या महिला, जे आपला कष्टाचा पैसा विश्वासाने बँकेत ठेवतात त्यांना फसवणुकीचे लक्ष्य केले जात आहे. घाई आणि मोह या दोन मानवी स्वभावांचा फायदा घेऊन सायबर चोरटे आपले जाळे विणत आहेत.

### १. घाई : फसवणुकीचे पहिले पाऊल

सायबर गुन्हेगार नेहमीच भीती घालून तुम्हाला घाई करायला लावतात. ''तुमचे वीज बिल भरले नाही तर आज रात्री वीज कापली जाईल'', ''तुमच्या बँकेचे केवायसी संपले आहे, लगेच अपडेट करा नाही तर खाते बंद होईल'' किंवा ''तुमचे पॅन कार्ड ब्लॉक झाले आहे'' असे संदेश पाठवले जातात.

**काय करावे? :**

अशी कोणतीही तातडीची मागणी आली की प्रथम शांत व्हा. बँक किंवा महावितरण कधीही अशा प्रकारे अचानक सेवा बंद करण्याची धमकी देत नाही. घाईत कोणताही निर्णय घेऊ नका. फोन कट करा. प्रत्यक्ष बँकेत किंवा संबंधित कार्यालयात जाऊन खातरजमा करा.




### २. मोह : आमिषांचा सापळा

''तुम्हाला ५ लाखांची लॉटरी लागली आहे'', ''घरबसल्या अर्धवेळ काम करून दिवसाला २ हजार कमवा'' किंवा ''महागडा मोबाईल फक्त ५०० रुपयांत मिळवा'' अशा आकर्षक ऑफर सोशल मीडियावर दिल्या जातात. यालाच फिशिंग म्हणतात. अनेकदा बचतीचा पैसा वाढवण्याच्या नादात महिला अशा लिंकवर क्लिक करतात.

सावधानता : लक्षात ठेवा, कष्टाशिवाय पैसे मिळत नाहीत. अनोळखी व्यक्तिने पाठवलेली कोणतीही लिंक क्लिक करू नका. मोफत गिफ्टच्या नावाखाली तुमची वैयक्तिक माहिती चोरली जाऊ शकते.

### ३. पिन आणि ओटीपी : तुमच्या तिजोरीची गुरुकिल्ली :

डिजिटल व्यवहारात ओटीपी आणि यूपीआय पिन हे तुमच्या बँकेच्या तिजोरीच्या चावीसारखे आहेत.

महत्त्वाचा नियम - : पैसे मिळवण्यासाठी कधीही पिन टाकावा लागत नाही किंवा क्यूआर कोड स्कॅन करावा लागत नाही. जर कोणी तुम्हाला ''पैसे पाठवतो, फक्त पिन टाका'' असे म्हणत असेल तर तो १००% फसवणुकीचा प्रकार आहे. तुमचा ओटीपी कधीही, कोणालाही, अगदी बँकेचा अधिकारी सांगणाऱ्या व्यक्तिलाही देऊ नका.

### ४. बचत गट, कामगारांसाठी विशेष सूचना

सामूहिक व्यवहार : बचत गटाच्या महिलांनी गटाचे व्यवहार करताना अधिकृत ॲपचाच वापर करावा. गटाच्या खात्याशी जोडलेला मोबाईल नंबर सुरक्षित ठेवावा.

**अनोळखी ॲप्स :** मोबाईलमध्ये स्क्रीन शेअरिंग ॲप्स कधीही डाऊनलोड करू नका. यामुळे समोरची व्यक्ती तुमच्या मोबाईलचा ताबा घेऊ शकते.

मजुरीचे व्यवहार : कामगारांनी आपली मजुरी थेट खात्यात घेताना विश्वसार्ह व्यक्तिकडूनच क्यूआर कोड तपासावा.

### फसवणूक झाली तर काय करावे?

दुर्दैवाने फसवणूक झालीच, तर घाबरून न जाता तातडीने पावले उचलणे गरजेचे आहे.

१. त्वरित आपल्या बँकेला कळवून खाते किंवा कार्ड ब्लॉक करा.

२. १९३० या राष्ट्रीय सायबर क्राईम हेल्पलाईन नंबरवर फोन करा.

३. www.cybercrime.gov.in या संकेतस्थळावर आपली तक्रार नोंदवा.

व्यवहार झाल्यापासून पहिल्या २ तासांत तक्रार केल्यास पैसे परत मिळण्याची शक्यता जास्त असते.

**निष्कर्ष : सतर्कता हीच सुरक्षितता :** आपला कष्टाचा पैसा सुरक्षित ठेवणे ही केवळ बँकेची नाही तर आपलीही जबाबदारी आहे. ''थांबा, तपासा आणि मगच व्यवहार करा'' हा मंत्र प्रत्येकाने अंगीकारला पाहिजे. आपण स्वतः जागरूक राहूया आणि आपल्या कुटुंबालाही सुरक्षित करूया. लक्षात ठेवा, तुमची एक छोटीशी सजगता तुम्हाला मोठ्या आर्थिक संकटातून वाचवू शकते.

# अपमान पचवल्याशिवाय मोठेपण नाही!



अशोक शेटे
संगमनेर
९९२११६९२८६

समाजात आपण लौकिक अर्थाने मोठे झालेली, यशस्वी झालेली अनेक माणसे पाहतो. त्यांचे कर्तृत्व, त्यांचे वैभव आणि समाजात असणारा त्यांचा मान-सन्मान पाहून अनेकांना त्यांचा हेवा वाटतो परंतु या यशस्वी माणसांचे जीवनचरित्र जर आपण जवळून पाहिले तर एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते की, अगदी तळापासून यशाच्या सर्वोच्च शिखरापर्यंत जाण्यासाठी त्यांना प्रचंड मोठा संघर्ष करावा लागलेला असतो. मेहनत, जिद्द आणि चिकाटी तर या जगात प्रत्येक जण आपापल्या पातळीवर करतच असतो; परंतु यशाच्या अंतिम टप्प्यापर्यंत आणि ध्येयापर्यंत तेच लोक पोहोचू शकतात, ज्यांच्यामध्ये सहन करण्याची कमालीची क्षमता असते. अपमान पचविण्याची अफाट शक्ती असते.

मानवी स्वभावाचे आणि संघर्षाचे अचूक वर्णन जगद्गुरू संत तुकाराम महाराज करतात.

**''जया अंगी मोठेपण। तया यातना कठीण।।''**

अर्थात ज्याला आयुष्यात मोठे व्हायचे असते त्याला तितक्याच कठीण यातना, वेदना, विखारी टीका आणि संकटांचे डोंगर पार करावे लागतात. आपल्या महाराष्ट्राची संतपरंपरा आणि इतिहास ही केवळ विचारांची नाही तर ती सहनशीलता आणि धैर्याची सर्वात मोठी शाळा आहे. जर आपण इतिहासात डोकावून पाहिले तर एक मोठे सत्य समोर येते. जेव्हा जेव्हा संतांनी किंवा महापुरुषांनी समाजाच्या कल्याणासाठी पाऊल उचलले तेव्हा त्यांना समाजाने प्रचंड छळले. संत एकनाथ महाराजांचे उदाहरण घ्या; पैठणच्या गोदावरी नदीवर स्नानाला जात असताना एका इसमाने त्यांच्या अंगावर तब्बल १०८ वेळा थुंकण्याचा नीचपणा केला परंतु एकनाथ महाराजांनी राग न धरता, प्रत्येक वेळी शांतपणे पुन्हा नदीत जाऊन स्नान केले. त्यांच्या या अथांग सहनशीलतेपुढे शेवटी तो थुंकणारा माणूस थकला. त्याचे नावही आज कोणाला माहीत नाही; पण आपल्या शांत आणि सहनशील स्वभावामुळे संत एकनाथ महाराज इतिहासात अमर झाले.

ज्ञानोबा माउलींचा विचार करा; ज्या वयात खेळायचे-बागडायचे, त्या वयात या समाजाने त्यांच्यावर आणि त्यांच्या भावंडांवर अमानुष बहिष्कार टाकला. त्यांना संन्याशाची पोरे म्हणून हिणवले. माउलींनी तो सर्व अपमान शांतपणे पचवला. त्यांच्या याच सहनशीलतेतून ज्ञानेश्वरीसारखा अजरामर ग्रंथ जन्माला आला. हाच इतिहास आपल्याला आधुनिक काळात क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या रूपाने पाहायला मिळतो. जेव्हा त्या मुलींना शिकवण्यासाठी घराबाहेर पडत तेव्हा सनातनी आणि विकृत प्रवृत्तीची माणसे त्यांच्यावर शेण, दगड-धोंडे फेकत, अर्वाच्य भाषेत त्यांचा अपमान करत. सावित्रीबाईंनी तो अपमान, ते दगड-धोंडे अंगावर झेलले. आपले शिक्षणाचे पवित्र कार्य सोडले नाही. आज इतिहासात डोकावले तर त्यांच्यावर शेण आणि दगड फेकणारे ते निंदक काळाच्या पडद्याआड गेले, त्यांचा मागमूसही उरला नाही परंतु त्या अपमानाला सहन करून क्रांतिची ज्योत पेटवणाऱ्या सावित्रीबाई फुले आज कोट्यवधी मुलींच्या आयुष्यात प्रकाशाचे माध्यम बनून इतिहासाच्या पानात अजरामर झाल्या आहेत. हिऱ्याला जितके पैलू पाडले जातात, तितकाच तो अधिक चमकतो. सोन्याला शुद्ध होण्यासाठी आगीच्या भट्टीत तावून-सुलाखून निघावेच लागते; माणसाच्या मोठेपणाचेही अगदी तसेच आहे.

आपण जर आपल्या सभोवतालच्या समाजाचा विचार केला तर समाज नेहमी माणसाला हिणवण्यात, त्याचे पाय खेचण्यात धन्यता मानत असतो. म्हणूनच की काय, खऱ्या अर्थाने यशाच्या शिखरावर पोहोचलेली माणसे फार कमी असतात. जो माणूस हा अपमान पचवू शकत नाही, सभोवतालच्या लोकांच्या छोट्या-छोट्या आरोपांनी आणि टोमण्यांनी घायाळ होतो आणि हे माझ्याच बाबतीत का घडते? असे रडत बसून आयुष्य जगतो तो माणूस कधीच प्रगती करू शकत नाही. तो सदैव सर्वसामान्यच राहतो. हाच एक मुख्य फरक सर्वसामान्य माणूस आणि यशस्वी माणूस यांच्यामध्ये असतो. निसर्गाचा एक नियम आहे, समाज नेहमी फळ देणाऱ्या झाडालाच दगड मारतो. वांझोट्या, वाळलेल्या झाडावर कोणी कधी दगड फेकत नाही. म्हणजेच जर तुमच्यावर टीका होत असेल तर समजून जा की तुमच्यात काही तरी कर्तृत्व आहे, तुम्ही काहीतरी ठोस करू पाहत आहात. असे समजून आपल्या मार्गावर चालत राहावे. तुम्ही जेव्हा यशाची शिडी चढू लागाल, त्यावेळी तुमच्यावर विविध आरोप होणार, तुमच्या आजूबाजूचे लोक तुम्हाला नावे ठेवणार, मानसिकदृष्ट्या खचवण्याचा आणि नाकेबंदी करण्याचा प्रयत्न करणार. हे सर्व तुम्ही मनात न घेता कसे पचवता, किती संयम दाखवता आणि पुढे जात राहता, यावरच तुमच्या यशाची रेषा अवलंबून राहते. जगाच्या इतिहासात असा एकही महापुरुष किंवा जननेता झाला नाही, ज्याला तीव्र विरोध झाला नाही किंवा ज्याने अपमान सहन केला नाही. अनेकदा तर समाजाने त्यांना सर्वस्व सोडून देण्याच्या उंबरठ्यावर आणून उभे केले होते. राजकारणी लोकांवर किती असुरी अघोरी टीका होते. जे ती संयमाने सहन करतात तेच येथे टिकतात. जे अपमानाचे घोट प्राशन करतात तेच पुढे जाताना दिसतात. जे टीकेने आणि पराभवाने विचलित होतात त्यांचे राजकारण संपते. शेवटी एवढेच सांगावेसे वाटते की, जगाचा इतिहास हा ज्यांचा लिहिला जातो जे अपमानाचे घोट, कमालीची सहनशीलता आणि विजिगीषु वृत्ती यामुळेच सर्वोच्च स्थानी पोहोचले आहेत. निंदक आणि त्रास देणारे नेहमी काळाच्या ओघात नष्ट होतात पण सहनशीलता बाळगणारे इतिहास घडवतात. अंतःकरणात ठसलेल्या, कोरलेल्या वेदनेशिवाय आणि अपमानाच्या जखमांशिवाय यशाची उंच शिडी कधीच चढता येत नाही. म्हणूनच आयुष्यात पुढे जाताना येणारी टीका, टोमणे आणि अपमानास्पद परिस्थितीला घाबरून न जाता, धैर्याने सामोरे जा कारण आज जे तुम्हाला मागे ओढत आहेत, उद्या तुमच्या यशाचे शिखर पाहून तेच तुमच्या स्वागतासाठी टाळ्या वाजवतील. चला तर मग, टीका, टिप्पणी आणि निंदानालस्तीला यशाचे इंधन तर अपमानालाच आपल्या यशाचा मार्ग बनवूया...



रवींद्र कामठे
पुणे
९४२१२ १८५२८

पुस्तक परिचय

# हृदयस्पर्शी परिसस्पर्श

एखादे पुस्तक वाचायला घ्यावे आणि त्या पुस्तकाने आपल्या मनाचा ठावच घ्यावा असा सुवर्णयोग जुळून यायला फारच नशीब असावे लागते. त्यात अनुभवकथन अथवा चरित्र हा विषय तर मला फारच भावतो आणि समृद्ध करून जातो. लेखक जेव्हा हातचे काहीच न राखता आपला जीव ओतून त्यांचे अनुभव लिहितात ना तेव्हा ते लिखाण आपल्या हृदयाच्या हळव्या कोपऱ्याला अलगद स्पर्श करून नकळत आपल्या स्मृतिंना उजाळा देऊन आपल्याला कधी भाऊक करतात हेच कळत नाही. अगदी तोच अनुभव मला लेखक सयाजी शिंदे यांच्या 'चपराक प्रकाशन'ने प्रकाशित केलेल्या 'परिसस्पर्श' ह्या आत्मचरित्रात्मक कादंबरीने दिला. 'परिसस्पर्श' कादंबरी मला पन्नास वर्षे मागे माझ्या बालपणातच घेऊन गेली आणि तिच्या पानापानात मला अशी काय गुंतवत गेली की हे आत्मकथन थोड्या फार फरकाने माझेच आहे की काय अशी मला शंका येऊ लागली होती.

बालपणापासून ते निवृत्तीपर्यंतचे आयुष्यातले चढउतार सयाजी शिंदे यांनी अतिशय प्रांजळपणे, अत्यंत साध्या आणि सोप्या भाषेत केलेले अनुभवकथन ही ह्या कादंबरीची वाखणण्याजोगी बाब आहे. लेखक सात वर्षाचे असताना त्यांच्या आईने त्यांच्या वडिलांच्या आज्ञेनुसार त्यांना दगडाने घासून पुसून घातलेली आंघोळ आणि तयार करून एका झोपडीवजा शाळेत त्यांचे घातलेले नाव, पुढे त्या मुलाने शिकून सवरून स्वत:ला घडवलेल्या एका उत्तम, सुसंस्कारी, कुटुंबवत्सल माणसाच्या जीवनाचा हा अत्यंत प्रेरणादायी प्रवास वाचतच राहावा असाच आहे.

ग्रामीण संस्कृतीचा बाज असलेली ही आत्मचरित्रात्मक कादंबरी सयाजी शिंदे यांच्या आयुष्यातील जिवंत अनुभवांनी इतकी ओतप्रोत भरलेली आहे की त्यांचा प्रत्येक अनुभव हा परिसस्पर्श होऊन बावनकशी सोन्यासारखा निखरतो आणि वाचकाला भावविभोर करतो. शिक्षणाबरोबरच बालपणात रानातले हुंदडणे, पाटाच्या पाण्यात पोहणे, कैरी, चिंचा, बोरे पाडून सवंगड्यांबरोबरची धमाल, मळ्यातल्या घराचा सहवास, लग्न कार्यात केलेली कमाल ह्या सर्व अनुभवांनी तर माझ्या पन्नास वर्षांपूर्वीच्या राहुरीतीलच गतस्मृतिंना उजाळा मिळाला.





मुळात एकत्र कुटुंब पद्धतीचे मनाला अतिशय भावणारे अनुभव आणि प्रसंग शिंदे यांनी त्यांच्या अनुभवकथनात इतके सुंदर गुंफले आहेत की काही काही प्रसंग वाचताना आपले डोळे आनंदाश्रुंनी कधी भरून येतात तेच समजत नाही. तसेच कादंबरीच्या शेवटी शेवटी त्याच एकत्र कुटुंबाला वडिलांच्या हयातीतच गेलेला तडा आणि त्यामुळे नात्यांची झालेली फरफट मन मात्र दु:खीकष्टी करून जाते. नाण्याच्या ह्या दुखऱ्या बाजूचे वास्तव दाखवण्यास लेखक अजिबात कचरत नाही हेच त्यांच्या प्रगल्भ प्रतिभेचे प्रतीक आहे असे म्हणावेसे वाटते. सयाजी शिंदे यांनी त्यांचे हे अनुभव कथन करताना कुठेही अतिशयोक्ती केलेली नाही अथवा कुठेही सहानभूतीची अपेक्षाही ठेवलेली नाही हे ह्या कादंबरीचे वैशिष्ट्य आहे.

शिंदे यांची आपल्या आई-वडील, काका-मावशी, मित्र मंडळी, शाळेतील सहकारी आणि इतर वडिलधाऱ्यांप्रती असलेली आदराची भावना अत्यंत निस्वार्थी वाटते. मुळात पाच भावंडांत (म्हणजे तीन भाऊ आणि दोन बहिणीत) त्यांच्या आई-वडिलांनी त्यांच्यावर टाकलेल्या विश्वासाला त्यांनी कुठेही कधीही तडा जाऊ दिलेला नाही. पन्नास वर्षांपूर्वीचा तो काळ त्यात ग्रामीण संस्कृतीचा लहेजा शिंदे यांनी अत्यंत प्रभावीपणे व्यक्त केला आहे. बालपण सरून वयाच्या जेमतेम १५-१६ वर्षीच जेव्हा त्यांच्या लग्नाचा विषय निघतो तेव्हाचे त्यांचे अनुभव, त्यांनी त्यांच्या आईवडिलांचे, थोरामोठ्यांचे मन न दुखवता नात्यातील त्यांना आवडत असलेल्या राधाशी केलेले लग्न आणि तिच्या बरोबर केलेला सुखी संसार, त्याचबरोबर शिक्षण पूर्ण करत करत वेगवेगळ्या परीक्षा देत केलेली शिक्षकाची नोकरी आणि त्यात होत असलेल्या बदल्यांचे अतिशय मार्मिक अनुभव भारावून टाकतात. सयाजी शिंदे यांच्या संवाद साधण्याच्या कलेचे करावे तेवढे कौतुक थोडे आहे, हे फार कमी लोकांना जमते हे निर्विवाद सत्य आहे. कुठेही अनावश्यक वादविवाद अथवा भांडण तसेच आततायीपणा ह्या कादंबरीत नावालाही दिसत नाही हे तर ह्या आत्मचरित्राचे वैशिष्ट्य आहे असेच म्हणावे लागेल.

सयाजी शिंदे यांची सहचारिणी राधा यांचे त्यांच्या सुखी, समाधानी आणि समृद्ध संसारातील योगदान शिंदे यांनी ज्या आत्मियतेने व्यक्त केले आहे ते पाहून ह्या कुटुंबाचा समाजाला नक्कीच हेवा वाटून त्यांचा आदर्श ठेवावा असे मला अगदी प्रकर्षाने जाणवले. नवरा बायकोतील योग्य वेळी, योग्य पद्धतीने साधलेला संवाद, संसारात किती सुख, समाधान आणि समृद्धी आणतो त्याचे हे पुस्तक म्हणजे अगदी ज्वलंत उदाहरण आहे. अगदी उदाहरणच द्यायचे झाले तर; आपण लग्न कधी करायचे, लग्नानंतर आपल्याला मूल कधी हवे आहे, एक झाल्यानंतर दुसरे कधी हवे आहे, दोन्ही मुलीच झाल्यावर वंशाला दिवा हवा आहे की नको! त्यावर तिसरे मूल नको हा दोघांनी एकत्रितपणे घेतलेला अतिशय भावनिक निर्णय वाचताना मन नि:संदीगद्धपणे दोघांच्या प्रेमात पडते.

वृद्धापकाळात आई वडिलांची इतर भावंडांनी नाकारलेली जबाबदारी आपणहून स्वीकारणे तसेच राधाच्या आई वडिलांचीही जबाबदारी स्वीकारणे आणि त्यासाठी करावा लागलेला त्याग, तडजोड आणि संघर्ष ह्या कादंबरीत व्यक्त करताना सयाजी शिंदे यांनी कुठेही आत्मप्रौढी न करता वाचकाच्या मनात माणुसकी, चांगुलपणा, आत्मियता, कुटुंबवत्सलता, आदर आणि स्नेहाच्या भावना उद्दीप्त केल्या आहेत. राधाने एक सहचारिणी म्हणून सयाजी यांना दिलेली मोलाची साथ आजच्या विवाहसंस्थेसाठी तर अगदी उत्तम उदाहरणच आहे असे मला वाटते. आपल्या दोन्ही मुलींवर त्यांनी असेच उच्चकोटीचे संस्कार रुजवून त्यांनाही उत्तम सहचारिणी बनवले आहे हे अजून एक वैशिष्ट्य आहे. संसार हा दोघांचा असतो, तो दोघांनी मिळून करायचा असतो इतके साधे सोपे आणि सरळ तत्त्वज्ञान शिंदे आपल्याला सांगून त्यांच्या नकळत समाज प्रबोधनाचेच कार्य करतात असे म्हणालो तर अतिशयोक्ती ठरणार नाही.

'परिसस्पर्श' ही आत्मचरित्रात्मक कादंबरी वाचल्यावर मला तर असे वाटते आहे की, प्रत्येकाने एकदा तरी ही कादंबरी वाचायलाच हवी आणि ज्यांचे आयुष्य नैराश्याने अथवा गृहकलहाणे ग्रासलेले आहे, त्यांना नक्कीच वाचायला द्यायला हवी. लेखक सयाजी शिंदे आणि 'चपराक प्रकाशन'चे मनापासून अभिनंदन. कादंबरीसाठी मोबाईल क्रमांक ७०५७२९२०९२ वर संपर्क करावा.

# व्यवस्थेला फोडी घाम; फक्त एक तुकाराम!

पान ३ वरून

**एक शि.मं.प्रतिनिधी** (प्रधानजींकडे पाहत) - म्हणजे महाराज सेवकाशी चर्चा करतात अन् हे दरबारी मंत्री मग...?

**प्रधानजी** - गप बसा हो! आम्ही सेवकाला फुल्लि ब्रिफिंग केलंय. तुमचं हित तेच आमच हित!

**प्रतिनिधी** - त्यात काय बरे नवनीत?

**एक मंत्री** - गप बसा आता. महाराज सर्वांना न्याय देतील याची खातरी बाळगा!

(महाराज व सेवक परततात. महाराज सिंहासनावर बसत.)

**महाराज** - तुमचं काय म्हणणं आहे हे आलंय आम च्या लक्षात. तुमचं गणित आणि आम्ही जपायचं सम ाजहित लक्षात घेऊन मला असे वाटते की, (प्रधानजी व मंत्र्यांकडे पाहत) लिहून घ्या सारं प्रधानजी..!

**प्रधानजी** - आज्ञा महाराज! (कागद-पेन सावरत)

**महाराज** - एकूण काय तर जनभावना आणि व्यापारी वर्गाचं हित याचा विचार करून आम्ही...! (उपस्थितांची उत्सुकता ताणली जाते, ते महाराजांचे बोलणे लक्षपूर्वक ऐकू लागतात.) आता अन्न व औषध प्रशासनाच्या कारभाराची चौकशी करण्यासाठी पुढील महिन्यात एक समिती गठीत करू कारण या महिन्यात जरा पाऊसपाण्याचीही बोंब आहे. योजना आखाव्या लागतील, पथके पाहणीसाठी नियुक्त करावे लागतील. अल् निनो घोंघावतंय. दिल्लीकरांची भेट घ्यावी लागेल आणि हो, एक महत्त्वाचं ऑपरेशनही मार्गी लावायचं. समजलं..!

**एक प्रतिनिधी (मध्येच बोलू लागतो)** - ते ऑपरेशन टायगर का काय म्हणतात तेच ना?

**महाराज** - खामोश! गप्प बसा नाही तर...!

**प्रतिनिधी** (काकूळतीला येत) - क्षमा असावी महाराज! मध्येच बोललो..! पण आमच नका हो ऑपरेशन वगैरे...!

**महाराज**- तर पुढील महिन्यात ही सेवानिवृत्त न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखालील समिती गठीत झाल्यावर सदर समिती अन्नपुरवठा, औषध निर्माण व विक्री व्यवस्थापन याचा अभ्यास करून सात महिन्यानंतर आपला अहवाल मंत्रीमंडळ बैठकीत आमच्यापुढे ठेवेल. मग आम्ही योग्य तो अंतिम निर्णय घेऊ. या समितीच्या तीनेक उपसमित्या असाव्यात.म्हणजे सर्वांगीण अभ्यास करून अहवाल आमच्यापुढे येईल. या समितीच्या सर्व नऊ सदस्यांना राज्यमंत्र्याचा दर्जा असेल. या समितीत एक यांचा प्रतिनिधीही घ्या. आजच्या या निर्णयावर लगेच कार्यवाही व्हावी...!

**एक मंत्री** (शेजारच्या मंत्र्याच्या कानात हळूच पुटपुटतात) - मला वाटतं तोपर्यंत सगळी साफसफाई तुकारामांचे हस्ते होऊन जाईल असं धोरण दिसतयं बरं?

**दुसरा मंत्री** - नाहीतरी तुकाराम एका ठिकाणी एवढे थोडंच थांबतात. सहा महिन्यांपेक्षा जास्त एकाच ठिकाणी थांबायला ते थोडेच रिकामे आहेत. नाही...! (एकमेकांस टाळी देतात.)

**एक शि.मं. प्रतिनिधी** - पण महाराज... तोपर्यंत पार दैना होईल की व्यवसायाची! कृपया...!

**महाराज (सिंहासनावरून उठत)** - बस! आता या विषयावर चर्चा नको! आमचा निर्णय झालाय! या तुम्ही आता!

(सेवक गालात हसतो. सारे कपाळावर हात मारून घेत बाहेर पडतात. दरबारीही दप्तर आवरत बाहेर जायची तयारी करतात.)

**सेवक** - याला म्हणतात लबाडाला लबाडा घरी जेवायचं आमंत्रण! व्वाह!

(पडदा पडतो.)

## लिहिणाऱ्या हातांसाठी 'चपराक'चे व्यासपीठ

साप्ताहिक 'चपराक'साठी आपणही आपले साहित्य अवश्य पाठवू शकता. विविध विषयांवरील आपली मते, सामाजिक, राजकीय विषयावरील प्रासंगिक लेख, अनुभव, आपल्या परिसरातील विविध उपक्रमांच्या, कार्यक्रमांच्या बातम्या असे साहित्य आमच्याकडे जरूर पाठवा. प्रवास वर्णन, वाचलेल्या आणि भावलेल्या पुस्तकांचे परिचय, आवडलेली व्यक्तिचित्रणे आदींचे स्वागत. सोबत काही पूरक छायाचित्रे, चित्रे असतील तर तीही पाठवा. ती ज्यांच्याकडून घेतली आहेत त्यांची नावेही कळवा. निवडक साहित्यास 'चपराक'मधून प्रसिद्धी दिली जाईल.

आपला मजकूर युनिकोडमध्ये खालील नंबर किंवा ई-मेलवर पाठवा.

**भ्रमणध्वनी :**

**७०५७२९२०९२/८७६७९४१८५०**

**ई मेल : info@chaprak.com**




# व्यसनाधीनता



**मयूर बागुल**
राज्य पुरस्कार प्राप्त लेखक
९०९६२१०६६९

**लघुकथा**

गावाच्या टोकाला असलेल्या जुन्या वडाच्या झाडाखाली संध्याकाळी नेहमीप्रमाणे काही तरुणांचा जमाव बसला होता. हसणं, गप्पा, मोबाईलवर गाणी सगळं अगदी साधं, रोजच्यासारखंच! पण त्या जमावात बसलेला रोहित मात्र आतून रिकामा होत चालला होता. बाहेरून तो नेहमीप्रमाणेच दिसत होता. हसरा, मोकळा, सगळ्यांचा लाडका! पण त्याच्या आयुष्यात एक अशी सावली शिरली होती जी हळूहळू त्याला गिळंकृत करत होती. रोहित एक साधा, हुशार मुलगा होता. वडील शेतकरी आणि आई गृहिणी. घरची परिस्थिती बेताची पण प्रेम भरपूर. रोहितला मोठं व्हायचं होतं, काही तरी करायचं होतं. कॉलेजला गेल्यावर त्याच्या आयुष्यात बदल घडू लागले. नवीन मित्र, नवीन वातावरण आणि 'मजा' नावाचा एक नवा शब्द त्याच्या आयुष्यात आला.

सुरुवात अगदी निरागस होती. एका वाढदिवसाच्या पार्टीत मित्रांनी त्याला सांगितलं, ''अरे, एक सिगारेट ओढून बघ. काही होत नाही.'' पहिल्यांदा त्याने नकार दिला पण मित्रांच्या आग्रहाने तो मान्य झाला. फक्त एकच आहे, त्याने स्वतःला सांगितलं. त्या एका सिगारेटने काहीच बदललं नाही असं त्याला वाटलं. उलट त्याला एक विचित्र आत्मविश्वास वाटला. जणू तो आता मोठा झाला होता. मग कधी कधी मित्रांसोबत सिगारेट, मग थोडी बीअर आणि हळूहळू त्याच्या आयुष्यात व्यसनाचं बी पेरलं गेलं. सुरुवातीला त्याला वाटायचं मी कधीही सोडू शकतो पण व्यसन कधीच परवानगी घेऊन येत नाही. ते हळूहळू आपल्या आयुष्याच्या प्रत्येक कोपऱ्यात शिरतं. रोहितचं अभ्यासावरचं लक्ष कमी होऊ लागलं. घरात आई विचारायची, ''काय रे, अभ्यास होत नाही का?''

तो हसत उत्तर द्यायचा, ''हो ना आई, सगळं ठीक आहे!'' पण काहीच ठीक नव्हतं. कॉलेजमध्ये त्याच्या मित्रपरिवारात बदल झाला. आता तो अशा लोकांसोबत राहू लागला ज्यांच्यासाठी नशा ही जीवनशैली होती. सिगारेटचं रूपांतर दारूमध्ये झालं आणि दारूचं रूपांतर आणखी घातक पदार्थांमध्ये. त्याला वाटायचं हे सगळं फक्त ताण कमी करण्यासाठी आहे पण ताण कमी झाला नाही, उलट वाढत गेला. घरात पैशांची चोरी होऊ लागली. आईला संशय यायचा पण ती विश्वास ठेवायची माझा मुलगा असं करणार नाही. वडील शांतपणे सगळं पाहत होते. एक दिवस त्यांनी रोहितला विचारलं, ''काही अडचण आहे का?''

रोहितचा आवाज चिडका झाला, ''तुम्हाला काहीच समजत नाही!''

त्या रात्री पहिल्यांदा त्याने स्वतःला आरशात पाहिलं. डोळे लाल, चेहरा थकलेला, आत्मविश्वास हरवलेला! पण त्याने पुन्हा स्वतःलाच फसवलं हे तात्पुरतं आहे. व्यसनाचं सर्वात मोठं वैशिष्ट्य म्हणजे ते माणसाला स्वतःच्याच विरोधात उभं करतं. रोहित आता पूर्णपणे त्या जाळ्यात अडकला होता. मित्र दूर गेले, जे खरे होते तेही. कॉलेज सुटलं. घरात वाद वाढले. आई रडू लागली. वडिलांच्या चेहऱ्यावर निराशा दिसू लागली. एक दिवस आईने त्याच्या खोलीत लपवलेली औषधं पाहिली. ती थरथरत त्याच्याकडे आली. ''हे काय आहे?'' रोहित शांत राहिला. आईच्या डोळ्यातलं पाणी त्याला पाहवत नव्हतं पण त्याच्यात ती सवय सोडण्याची ताकदही उरली नव्हती. त्या दिवशी पहिल्यांदा त्याने स्वतःला मान्य केलं तो व्यसनाधीन झाला होता. व्यसनामुळे त्याचं शरीरच नाही तर मनही कमकुवत झालं होतं. तो रागीट झाला होता. लहान गोष्टींवर चिडचिड करायचा. स्वतःवरचं नियंत्रण हरवलं होतं. एक दिवस तो बेशुद्ध अवस्थेत सापडला. गावात खळबळ उडाली. आई-वडील त्याला दवाखान्यात घेऊन गेले. डॉक्टरांनी शांतपणे सांगितलं, ''जर आता बदल केला नाही तर उशीर होईल.'' त्या शब्दांनी रोहितच्या मनात काहीतरी हललं. तो पहिल्यांदा खरोखर घाबरला. ज्या व्यसनाने त्याला 'मजबूत' वाटायला लावलं होतं, त्यानेच त्याला सर्वात कमकुवत केलं होतं. पुनर्वसन केंद्रात जाण्याचा निर्णय सोपा नव्हता. सुरुवातीचे दिवस अत्यंत कठीण होते. शरीर ओरडत होतं. मन तुटत होतं पण त्या वेदनांमध्ये त्याला एक सत्य दिसू लागलं, व्यसन हे आनंदाचं साधन नाही तर आत्मविनाशाचा मार्ग आहे. आई रोज भेटायला यायची. तिच्या डोळ्यात आशा होती. वडील काही बोलत नसत पण त्यांच्या शांततेत माफी होती. हळूहळू रोहित बदलू लागला. त्याने पुन्हा स्वतःला शोधायला सुरुवात केली. महिने गेले. एक दिवस तो पुन्हा त्या वडाच्या झाडाखाली उभा होता पण यावेळी तो वेगळा होता. त्याच्या डोळ्यात स्पष्टता होती. चेहऱ्यावर शांतता होती. त्याने स्वतःला वचन दिलं तो आता त्या सावलीला परत येऊ देणार नाही. व्यसनाने त्याच्याकडून खूप काही हिरावलं होतं. वेळ, स्वप्नं, नातं, आत्मसन्मान! पण त्याने त्याला एक गोष्ट शिकवली जीवनातली खरी ताकद नशेत नसते तर स्वतःवर नियंत्रण ठेवण्यात असते. त्या दिवसानंतर रोहित गावातल्या तरुणांना सांगू लागला व्यसन सुरुवातीला मजा वाटतं पण शेवटी ते सगळं हिरावून घेतं. त्याची कथा आता इशारा बनली होती कारण व्यसन कधीच अचानक नष्ट करत नाही. ते हळूहळू, सावलीसारखं आयुष्य गिळतं! पण त्या सावलीतून बाहेर पडण्याचा मार्ग असतो जर माणूस स्वतःशी प्रामाणिक झाला तर!

# फक्त पोरांवर लक्ष द्या!



**भरत विठ्ठल पाटील**
मालेगाव, नाशिक
९६६५९११६५७

**मज आवडते मनापासूनी शाळा**

शालेय नवीन शैक्षणिक वर्ष सुरू होत असल्याने शाळा व्यवस्थापन समिती, माता पालक, शिक्षक पालक यांची शाळेची भविष्यकालीन नियोजनाविषयी बैठक आयोजित करण्यात आली होती. उपस्थित सर्वांना मागील वर्षाचा आढावा देताना या शैक्षणिक वर्षात राबवायचे उपक्रम, शालेय अभ्यास, भौतिक बाबी यावर चर्चा करण्यात आली. सकारात्मक बाबी लक्षात घेत पालकांनीही शालेय प्रगतीविषयी सामूहिक कौतुक केले. आम्हाला सर्वांना भारी वाटले. करत असलेले काम योग्य दिशेने आहे हा आत्मविश्वास आमच्यात आला. उपस्थित पालकांनी आपल्या पाल्यांविषयी असलेल्या अपेक्षा व्यक्त केल्या. त्यास आम्ही आमच्या परीने उत्तरे दिली. आता अध्यक्ष या नात्याने शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष विठ्ठल ताडगे यांनीही आपला लेखाजोखा मांडताना आपल्या शाळेतर्फे अपेक्षा व्यक्त केल्या. त्यात हृदयाच्या कप्प्यात त्यांचं एक वाक्य खोलवर रुजलं, ते म्हणाले, ''सर, आम्हाला काही विशेष नको. फक्त पोरांवर लक्ष द्या. त्यांना चांगलं शिकवा, संस्कार द्या आणि त्यांचं भविष्य घडवा.''

तरुण युवा असलेला धिप्पाड गडी अध्यक्ष या नात्याने त्यांनी व्यक्त केलेली ही भावना केवळ एका व्यक्तिची मागणी नव्हती ती आज ग्रामीण भागातील असंख्य पालकांच्या अपेक्षांचे प्रतिनिधित्व करणारी आहे. शाळा ही केवळ शिक्षण देणारी संस्था नसून समाज घडविण्याचे केंद्र आहे, हे ते समजून होते. त्यामुळे शिक्षकांकडून समाजाच्या म्हणजे आमच्या अपेक्षा मोठ्या आहेत हे ते प्रातिनिधिक म्हणून बोलत होते. आम्ही आमचा प्रशासकीय कामांना पुढे करत विद्यार्थ्यांना देत असलेला वेळ याविषयी बोलू लागताच ते म्हणाले, ''गुरू, तुम्हाला किती कामे करावी लागतात हे आम्ही कायम पाहतो. तुम्ही सारे खूप मेहनत घेता. आमचे त्याविषयी काही म्हणणे नाही. आमच्या अपेक्षांच्या पूर्ततेसाठी शिक्षकांना किती विविध कामांमध्ये गुंतावे लागते, याचा विचार फारसा होत नाही पण आम्ही सारे जाणतो.''


ते बोलत होते. आम्ही सुजाण नागरिकाचे सकारात्मक विचार ऐकत तृप्त होत होतो. खरे पाहता आज शिक्षण विभागामार्फत विविध शैक्षणिक उपक्रम राबवले जातात. त्यासोबतच शासनाच्या अनेक योजना, सर्वेक्षणे, माहिती संकलन, ऑनलाइन नोंदी, विविध पोर्टलवरील माहिती अद्ययावत करणे, प्रशिक्षण, अहवाल सादर करणे, बैठकांना उपस्थित राहणे, निवडणूक कामे, जनगणना, विविध मोहिमा अशा अनेक जबाबदाऱ्या ऑनलाईन, ऑफलाईन शिक्षकांवर येतात. ते दिवसभरात लिलया पार पाडतात. ते करत असलेले प्रत्येक काम महत्त्वाचे असते; कारण ते शासनाच्या धोरणांची अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक असते मात्र या सर्व कामांमध्ये शिक्षकांचा मोठा वेळ खर्च होतो, हे लक्षात येतच नाही. शिकवता शिकवता ते आलेलं काम पूर्ण करावे लागते. त्यात आज, आत्ता, ताबडतोब अशा शब्दांमुळे तर पुन्हा जेरीस येणं वेगळं. त्यात पालकांची असलेली अपेक्षा अगदी स्पष्ट असते. त्यांच्या दृष्टीने शिक्षक म्हणजे त्यांच्या मुलाच्या भविष्यासाठी झटणारा मार्गदर्शक. मुलाने व्यवस्थित वाचन करावे, लेखन सुधारावे, गणित समजावे, आत्मविश्वास वाढावा आणि चांगला नागरिक बनावा, हीच त्यांची इच्छा असते. त्यामुळे जेव्हा शाळा व्यवस्थापन समितीचा अध्यक्ष 'फक्त पोरांवर लक्ष द्या' असे म्हणतो तेव्हा तो सर्व पालकांच्या मनातील भावना मांडत असतो, हे आम्ही जाणून होतो. खरे तर मुलांच्या विकासासाठी शिक्षक आणि पालक यांची भागीदारी अत्यंत आवश्यक आहे. गेल्या तीन वर्षापासून राबवत असलेले विविध नावीन्यपूर्ण उपक्रम, विद्यार्थी उपस्थिती, गुणवत्ता यामुळे गावात सकारात्मक वातावरण निर्माण झाले. काही पालक मुलांच्या शिक्षणात सक्रिय सहभाग घेतात. गृहपाठ तपासतात, शाळेतील कार्यक्रमांना उपस्थित राहतात आणि शिक्षकांशी सतत संपर्क ठेवतात परंतु अनेक वेळा पालकांची जबाबदारी केवळ शाळेकडे सोपवली जाते. मुलांचा मोबाईल वापर, अभ्यासाची सवय, वाचनाची आवड, घरातील शैक्षणिक वातावरण याकडे दुर्लक्ष केले जाते. मुलांच्या यशासाठी पालकांनीही तितक्याच जबाबदारीने सहभागी होणे गरजेचे आहे असे वाटून जाते. गृहभेटी दरम्यान येत असलेला अनुभव हा उपयुक्त असतो.

आज शिक्षकांवरील प्रशासकीय कामांचा वाढता भार ही एक गंभीर बाब लक्षात येत नाही असे नाही पण करणार काय? अशी अवस्था होऊन जाते. शिक्षणाच्या गुणवत्तेबाबत सर्वच स्तरावर चिंता व्यक्त केली जाते. मग शिक्षकांना अधिकाधिक वेळ अध्यापनासाठी उपलब्ध करून देणे आवश्यक ठरते. अहवाल, माहिती संकलन आणि इतर अशैक्षणिक कामांसाठी स्वतंत्र यंत्रणा उपलब्ध झाली तर शिक्षकांचा अधिक वेळ विद्यार्थ्यांसाठी खर्च होऊ असा विचार मनात येत असताना आता फक्त दर शनिवारी ऑनलाईन ऑफलाईन कामे, शालेय कामे पूर्ण करावीत, माहिती मागवावी हे परिपत्रक आशादायी वाटते. शिक्षकांना कराव्या लागणाऱ्या अतिरिक्त कामांविषयी गावातील शाळा व्यवस्थापन समित्या ह्या याबाबत महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. ''फक्त पोरांवर लक्ष द्या'' ही मागणी करताना अध्यक्ष शिक्षकांवर टीका करत नाहीत; उलट शिक्षकांना विद्यार्थ्यांसाठी अधिक वेळ मिळावा, अशी त्यांची रास्त अपेक्षा आहे हे ते बोलूनही दाखवतात. ते पुढे म्हणतात, ''गुरू, तुमच्या डोळ्यासमोर फक्त विद्यार्थी पाहिजे. तुम्ही आम्ही फक्त शाळेत येणारा विद्यार्थी कसा भारताचा सुजाण नागरिक बनेल यावर लक्ष देऊ. शासनाच्या योजना, प्रशासकीय प्रक्रिया, पालकांचा सहभाग आणि तुमचे प्रयत्न या सर्वांचा अंतिम उद्देश विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हाच असला पाहिजे. मुलांच्या डोळ्यांतील स्वप्ने पूर्ण करण्यासाठी शिक्षकांना आवश्यक वेळ, साधने आणि सहकार्य मिळणे ही काळाची गरज आहे. हे आम्ही जाणतो. दोन भौतिक गोष्टी नसल्या तर चालतील पण सर, फक्त पोरांवर लक्ष द्या. बाकी सारे नंतर बघू.''

# प्रेमाच्या गावा जावे...ओशोंच्या गोष्टी



संदीप वाकचौरे
साहित्यिक, शिक्षणतज्ज्ञ
८३२९३२८४७०




**प्रेम ही माणसाच्या जीवनातील सर्वोच्च भावना आहे. प्रेमाचे नाते असेल तर त्या नात्यातील वीण अधिक घट्ट होत जाते. मुळात नात्यातील मालकी हक्क वजा केला की नाते प्रेमाने फुलून येते. प्रेमासाठी अंतर्मनात ओलावा असावा लागतो. प्रेम ही भावना माणसांच्या अंतरिक शुद्धतेची भावना असते. अलीकडे मात्र प्रेमाच्या अर्थाला विकृतीशी जोडले जात आहे. प्रेमाचा अर्थ समर्पण आहे. माणसं दोन असली तरी हृदय एकच असते, ही भावना आज हरवली आहे. प्रेम म्हणजे स्वतःला शोधणे आहे. प्रेम करता येणे हे माणूसपणाचे लक्षण आहे. प्रभू येशू ख्रिस्त म्हणाले होते की, प्रेम म्हणजे ईश्वर आहे. आज माणूस प्रेमात पडला की, म्हटले जाते की, माणूस प्रेमात फसला आहे. जे एकमेकाला फसवते ते प्रमे कसे? प्रेमात बहरणे, फुलणे असते. तेथे फसणे आणि फसवण्याचा विचार कसा असेल? मात्र त्यासाठी माणसं नितळ मनाची असावी लागतात.**



प्रेमाच अर्थ त्याशिवाय कळणार कसा? परमेश्वर आणि भक्त यांच्या नात्यातही एक प्रकारचे प्रेममय नाते असते. प्रेम म्हणजे विश्वास असतो. प्रेम म्हणजे विवेक आहे. प्रेम म्हणजे आकर्षण नाही तर जीवन उन्नतीचा प्रवाह आहे. आज प्रेमाला फक्त आकर्षणाचे स्वरूप आले आहे. अर्थ चुकला की, दिशाही चुकते... आणि मग एखादा शब्द, व्यक्ती कशी बदनाम होते हे आपण आपल्या अवतीभोवती आपण पाहत आहोत. तुम्ही जेव्हा प्रेम करता तेव्हा समर्पणाशिवाय दुसरे काहीच नसते. समर्पणाचा भाव असेल तर देण्यासारखे जितके असते तितके सारे दिले जाते. मग हाती काहीच राखून ठेवणे घडत नाही.

एकदा ओशो निवांतपणे गप्पा मारत बसले होते. त्यांच्या अवतीभोवती काही तरूणही बसले होते. ओशो जे काही सांगते होते, ते सर्व विचार उपस्थितीत असलेले सर्व तरूण अत्यंत शांतपणे ऐकत होते. अनेकांच्या चेहऱ्यावर आनंदाचा भाव होता. कोणाच्या तरी चेहऱ्यावरून त्यांच्या मनात प्रश्न काहूर होते हे लक्षात येत होते. ओशो हेही पाहात होते, तेव्हा त्यांनी उपस्थित असलेल्या तरूणांना प्रश्न विचारण्याचे आवाहन केले. अखेर वयाने आणि मनाने तरून असलेल्या एकाने ओशोंना प्रश्न विचारला की, ''प्रेम म्हणजे काय? मला प्रेमाची नेहमीच भीती वाटते, प्रेमात मी हरवून जाईन, माझे अस्तित्व संपेल.''

त्यांचा हा प्रश्न ऐकून घेतल्यावर ओशो शांतपणे हसले आणि म्हणाले ''मित्रा, प्रेम म्हणजे हरवणे नाही तर स्वतःला शोधणे आहे. आपण कोण आहोत, इतरांचा शोध घेण्याऐवजी स्वतःचा शोध घेणे म्हणजे प्रेम आहे. खरं तर तुम्ही जेव्हा प्रेमात असता तेव्हा तुम्ही डुंबत असता. डुंबणे जेव्हा घडते तेव्हा तुम्ही कोरडे राहू शकणार नाही. प्रेमात असाल तर जगण्याची उमेद उंचावत असते. त्यामुळे प्रेमाची भीती असण्याची शक्यता नाही. भीती जेथे असते तेथे प्रेम नाही. प्रेमात फसवणुकीची शक्यता अजिबात नाही. फसवले गेला असाल तर तेथे प्रेम नव्हते हे लक्षात घ्यायला हवे. जेथे फसवणूक नाही, तेथे भीती असत नाही. भीती हा शब्द एका अर्थाने प्रेम भावनेच्या विरोधातील आहे. प्रेमात माणसं निडर बनतात. त्यामुळे भीतीची वाट तुमच्या मनात असेल तर तुम्ही खऱ्या प्रेमाच्या वाटेवर नाही आहात असे समजावे. प्रेम आणि भीती सोबत असण्याची शक्यता अजिबात नाही.


खऱ्या प्रेमात अहंकार वितळतो आणि खऱ्या अर्थाने स्वतःची ओळख उलगडते. आपली प्रतिष्ठा, श्रीमंती, जात-धर्मभेद सारे काही विसरले जाते. आपल्याला ज्या गोष्टींचा अहंकार असतो, मग तो सौंदर्याचा, श्रीमंतीचा, सत्तेचा, ज्ञानाचा अगदी कसलाही असला तरी तो गळून पडतो. मुळात अहंकारमुक्त भावना म्हणजे प्रेम असते. आपले जीवन जेव्हा अहंकारमुक्त असते तेव्हाच आपल्याला सत्याच्या शोधाच्या दिशेने प्रवास घडत असतो.

ओशो पुढे म्हणाले की, प्रेमाची भावना म्हणजे मालकी हक्क नाही. आज माणसं जेव्हा एकमेकावर प्रेम करतात तेव्हा एकमेकाचे मालक असल्याच्या भावनेचे दर्शन होते. आपण मालक आहोत अशी भावना निर्माण झाली, की कोणी तरी नोकर बनते. कोणी तर निम्न आणि कोणी तरी श्रेष्ठ ही भावना दृढ बनत जाते. अशावेळी प्रेमाचे नाते फुलण्याची शक्यता नाही. ते फुलण्यासाठी अंहकारमुक्तीची गरज असते. तुमच्या नात्यात तो समानतेचा विचार नसेल तर प्रेमाची वाट निमर्ण होऊ शकणार नाही. प्रेमाच्या नात्यात जर कोणाला बांधून ठेवणे घडत असेल तर ते प्रेम नाही; ते कैद करणे आहे. प्रेम म्हणजे दुसऱ्याला मुक्त करणे, त्याला त्याच्या स्वभावानुसार जगू देणे आहे. माणसं प्रेम करतात तेव्हा स्वांतत्र्य गमावणे घडते. स्वातंत्र्य हरवल्याला जे उरते ते प्रेम नाही.

लग्न झाल्यावर माणसं प्रेम करतात असं म्हणतात पण त्यात नाते आहे आणि या नात्यात बंधन आहे. पत्नीला पतीचे मनासारखे ऐकावे लागते किंवा पतीला पत्नाचे ऐकावे लागते. ऐकणे यात बंधन असते. प्रेम असलेही पण बंधन आले की, खऱ्या प्रेमाचा भाव संपतो आणि फक्त नात्याचा भाव उरतो. बंधनाचा भाव हा मालकीचाच असतो. त्यामुळे जेथे मालकी दिसते तेथे स्वातंत्र्याचा विचार हरवलेला असतो. प्रेम जेव्हा असते तेव्हा दुसऱ्याला बदलण्याचा प्रयत्न करत नाहीस, तर त्याला जसा आहे तसा स्वीकारतोस हा भाव महत्त्वाचा आहे. प्रेम असलेली व्यक्ती ही गुणांचा भाव असते पण माणूस म्हटले की, शंभर टक्के गुणांचा पुतळा असत नाही तर गुण-अवगुणांचा सरमिसळ असते. त्यामुळे खरोखर प्रेम असेल तर आहे तसे स्वीकारता येणे महत्त्वाचे असते. भगवान श्रीकृष्ण आणि सांदीपनी यांच्यात किती तरी अंतर होते पण अंतर होते ते भौतिक. मनाच्या प्रेमात कोणतेच अंतर नव्हते. त्यामुळे त्यांच्या प्रेमात कोणताच अडथळा आला नाही. प्रेमाचा भाव सत्य असेल तर कोणतेच अंतर पडत नाही. प्रेमात स्वीकृतीचा भाव शंभर टक्के असतो. आपण ज्याला स्वीकारले आहे, त्याचे गुण-दोष काढणे अथवा उणीवांचा शोध घेतला जात नाही मात्र हे जेथे घडते तेथे मालकत्वाचा भाव असतो. मालकत्वाच्या विचारांचा पराभव, स्वातंत्र्याची प्रेरणा आणि समर्पणाचा भाव म्हणजे प्रेम असते.

गुण अवगुणांसह स्वीकार म्हणजे खरी करुणा. प्रेम म्हणजे स्वातंत्र्य. प्रेमात दुसऱ्याला बंधनात ठेवण्याचा भाव नसतो. खरी भावना म्हणजे स्वीकार असते. जशी व्यक्ती आहे तशीच स्वीकारणे घडत जाते. प्रेमात अहंकाराचा नाश झालेला असतो. जेथे तुमच्या मनात अहंकाराचा वारा स्पर्श करतो तेव्हा तो भाव म्हणत असतो की, ''हा माझा आहे.'' पण प्रेमाचा भाव असेल तर तो भाव म्हणतो, ''हा स्वतःचा आहे आणि मी त्याला मुक्तपणे स्वीकारले आहे.''असं स्वीकारता येणे कितीतरी महत्त्वाचे असते. आज हा भाव हरवलेला दिसतो आहे. म्हणजे प्रेमाच्या वाटेने जाणारी माणसं निराश होत आहेत. आत्महत्येसारख्या पाऊलवाटेचा प्रवास करत आहेत. ज्याला मालक होण्याची इच्छा आहे त्याला प्रेमाच्या प्रवासात सुख, आनंद कधीच मिळणार नाही हे वास्तव आहे. प्रेम म्हणजे देत राहणे... त्या देण्यात पैसा, संपत्ती, धन, दौलत नाही तर फक्त समर्पण आहे.

प्रेम म्हणजे स्वतःला ओळखणे आहे. जेव्हा आपण प्रेम करतो तेव्हा आपल्याला स्वतःची खरी ओळख होण्यास सुरूवात झालेली असते. माणूस प्रेमात असेल तर अधिक संवेदनशील असतो. अधिक करुणामय होत असतो. ओशो म्हणतात: ''प्रेम हे सर्वात मोठे ध्यान आहे. प्रेमात असलेल्या माणसाला पुन्हा स्वतंत्रपणे ध्यान करण्याची गरज उरत नाही. जेथे प्रेम आहे तेथे एकाग्रतेची वाट असते. दुसरे काहीच स्मरत नाही. प्रेम म्हणजे एकाग्रता आहे. ही एकाग्रता लाभली की आपोआप ध्यानाचा प्रवास घडत जातो. प्रेमात जेव्हा अहंकार असत नाही तेव्हा साक्षीभाव आणि स्वीकृतीचा भाव असतो. प्रेम म्हणजे दुसऱ्याला बांधून ठेवणे नव्हे तर त्याला मुक्त करणे. प्रेमात आपण हरवत नाही तर स्वतःला अधिक खोलवर शोधत जात असतो. आयुष्यातील एका परमोच्च आनंदाचा तो भाव असतो. प्रेम हे जीवनाचे सर्वात मोठे ध्यान आहे कारण त्यात अहंकार नाही, फक्त स्वीकार आहे. हा विचार वर्तमानातही अधिक महत्त्वाचा आहे. नातेसंबंधांमध्ये मालकी हक्क, अपेक्षा आणि नियंत्रण यामुळे तणाव निमर्ण होतो आहे. प्रेमाला जर स्वातंत्र्य दिले तर नातेसंबंध अधिक सुंदर आणि टिकाऊ होतात. त्यामुळे केव्हा तरी खऱ्या प्रेमाचा अर्थ शोधत जाऊन आपण प्रेमाची वाट चालू लागलो तर जीवन आनंदाने फुलून आल्याशिवाय राहणार नाही. आपल्याला माणसांची ओढ नाही, संवादाची भूक नाही, प्रतीक्षा नाही तर फक्त आकर्षण असेल, तर आपली वाट चुकलेली आहे असे समजावे. शेवटी आपण कोणत्या वाटेने जायचे आहे हे स्वतःच ठरवायला हवे.




## पुस्तकाची ठळक वैशिष्ट्ये

- महाराष्ट्रातील विविध भागांत प्रयोगशील उपक्रम राबवणाऱ्या शिक्षकांच्या कथा.
- शिक्षण क्षेत्रात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी मार्गदर्शक.
- शिक्षणप्रेमी, शिक्षक, पालक आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांसाठी एक अनिवार्य वाचन.
- शिक्षणाच्या माध्यमातून राष्ट्र उभारणीसाठी सुरू असलेल्या प्रयत्नांचा लेखाजोखा.

महाराष्ट्राला शिक्षकांची एक मोठी परंपरा लाभलेली आहे. खेड्यापाड्यांमध्ये अनेक शिक्षक आपल्या नावीन्यपूर्ण योगदानाने शिक्षण प्रक्रियेत योगदान देत आहेत. २०२५ या वर्षात दैनिक अ‍ॅग्रोवन वृत्तपत्राकडून पुन्हा एकदा मला लेख लिहिण्याची संधी मिळाली. ही संधी महाराष्ट्रातील उपक्रमशील शिक्षकांच्या कार्याचा परिचय करून देण्यासाठी कारणी लावावी असे माझ्या मनाने घेतले. मी स्वतः शिक्षक म्हणून तीन दशकांहून अधिक काळ काम केलेले असल्याने अनेक चांगल्या शिक्षकांबद्दल मला पाहून, वाचून माहिती होते. 'चांगली माणसे मोजण्यासाठी हाताला हजार बोटे असावीत' असे भालचंद्र नेमाडे म्हणतात ते खरेच आहे. शोधायला गेले की आपल्या अवतीभोवती उत्तमोत्तम कार्य करणारे अनेक शिक्षक नजरेत येऊ लागतात. त्यामुळे अखेरचा लेख लिहितानाही आपण तो शिक्षकांविषयीच लिहावा असे मनात आले आणि त्या शिक्षकाचा शोधही मला माझ्या जवळच लागला.

– डॉ. कैलास दौंड

चपराक प्रकाशन www.chaprak.com
संपर्क : ७०५७२९२०९२
info@chaprak.com

प्रति,



साप्ताहिक चपराक www.chaprak.com
RNI No. MAHMAR/2011/35979

'चपराक' आणि 'लाडोबा' प्रकाशनची पुस्तके घरपोच मागविण्यासाठी हा क्यूआरकोड स्कॅन करा
संपर्क : ७०५७२९२०९२

# लाडोबा प्रकाशनतर्फे बालकुमारांसाठी त्रैभाषिक कथासंग्रह

**पुणे :** मराठीतले साहित्य इतर भाषांत जायला हवे, अशी अपेक्षा सातत्याने व्यक्त केली जाते. विशेषतः बालकुमारांसाठी असे प्रयोग होणं जास्त गरजेचं असतं. याचाच एक भाग म्हणून लाडोबा प्रकाशनतर्फे 'पुलो डिअर' हा त्रैभाषिक कथासंग्रह प्रकाशित होत असल्याची माहिती प्रकाशक घनश्याम पाटील यांनी दिली.

शिक्षण क्षेत्रात सातत्याने नवनवीन प्रयोग करणाऱ्या नांदेड येथील ज्येष्ठ लेखिका आशा पैठणे यांच्या पाच कथा या संग्रहात आहेत. मूळच्या या मराठी कथांचा स्वाती कान्हेगावकर यांनी हिंदी तर डॉ. अश्विनी भोरे यांनी इंग्रजी अनुवाद केला आहे. एकाच पुस्तकात मराठी, हिंदी आणि इंग्रजी कथा सचित्र असल्याने बालवाचकांना ही साहित्यिक मेजवानी मिळणार आहे. शिवाय यातील मराठी कथांच्या अभिवाचनाचा क्यूआर कोड पुस्तकात दिला असल्याने रसिका तुळजापूरकर यांच्या आवाजात या कथा ऐकताही येणार आहेत.'अमराठी मुलांपर्यंत मराठी साहित्य प्रभावीपणे पोहोचावे, इतर भाषा भगिनींबद्दल तिरस्कार, द्वेष न राहता आदर, प्रेमभाव आणि स्नेह वाढावा या हेतूने या पुस्तकाची निर्मिती करण्यात येत आहे. या प्रयोगामुळे मुलांचे अनुवादकौशल्य वाढीस लागणार असून अभिवाचनाचीही गोडी निर्माण होणार असल्याचे घनश्याम पाटील यांनी सांगितले.



डावीकडून डॉ. अश्विनी भोरे, आशा पैठणे आणि स्वाती कान्हेगावकर

या प्रयोगाबाबत लेखिका आशा पैठणे म्हणाल्या, ''माझ्या या गोष्टी निसर्ग, समाज, घर आणि मुलांची मने यांना जोडणाऱ्या आहेत. थोडी गंमत आणि थोडे शिकणे आहेच, म्हणूनच मुलांना आनंद देणाऱ्या या गोष्टी आहेत. एखादे पुस्तक प्रकाशित करायचे तर ते एक आव्हानच आहे आणि अशी नवी आव्हाने स्वीकारणे, नवीन प्रयोग करणे यात ज्यांची मातब्बरी आहे असे 'चपराक' आणि 'लाडोबा'चे प्रकाशक घनश्याम पाटील यांचा फार मोठा वाटा आहे. एकदा का मनात आले, की घनश्याम पाटील वायुवेगाने सारे जुळवून आणतात. त्यामुळेच हे पुस्तक बालवाचकांपर्यंत पोहोचणार आहे.''

> मराठीत वैविध्यपूर्ण विषयांवरील उत्तमोत्तम साहित्य प्रकाशित व्हावे, यासाठी आमचे अथक प्रयत्न सुरू आहेत. विशेषतः बालकुमारांसाठी चांगले साहित्य आल्यास उत्तम वाचक आणि भविष्यातील आदर्श नागरिक निर्माण होण्यास हातभार लागणार आहे. भाषिक मर्यादा ओलांडून मराठीतील साहित्य अन्य प्रादेशिक भाषांत आणि जागतिक स्तरावर जावे, यासाठी चपराक आणि लाडोबा प्रकाशनतर्फे आम्ही काही प्रयोग करत आहोत. हे पुस्तक त्याचाच एक महत्त्वपूर्ण भाग आहे.
>
> **– घनश्याम पाटील,** प्रकाशक

---

**पॉझिटिव्ह संडे**

# सियाचीनवरही योगाचा फायदा



**सुहास काणे**
अरण्येश्वर प्रभात संघ शाखा, पुणे

प्रत्येक व्यक्तिच्या आयुष्यात असा एखादा प्रसंग येतो जो आयुष्यभर आनंदाचा क्षण म्हणून लक्षात राहतो. १५ ऑगस्ट १९८६ हा दिवस माझ्या आयुष्यातील एक अविस्मरणीय दिवस होता.

'ऑपरेशन मेघदूत' या योजनेअंतर्गत सियाचीन ग्लेशियरवर लष्करासाठी काही स्ट्रक्चर निर्मिती करावयाची होती. (DRDO R&D इंजिनियर्स) मध्ये मी सायंटिस्ट म्हणून कार्यरत असल्यामुळे असल्यामुळे त्या कामासाठी माझी निवड करण्यात आली. अठरा हजार फुटावरील 'कुमार पोस्ट' वर '५ गार्ड रेजिमेंट'मध्ये सुमारे दोन महिने राहण्याची व काम करण्याची संधी मला मिळाली. काम तातडीचे असल्याने जुलै १९८६ च्या मध्यावर, १० हजार फूट ते १८ हजार फूट उंच आणि ४० किलोमीटर दूर, अशा चार दिवसाच्या बर्फावरील प्रवासाऐवजी हेलिकॉप्टरने केवळ वीस मिनिटात मी कुमार कॅम्पवर पोहोचलो.

कुमारच्या हेलिपॅडवर मधून उतरून माझी हॅवर सॅक घेऊन आठ-दहा पावलं चाललो असेन, त्या उंचीवरील विरळ हवेतील ऑक्सिजनची कमतरता मला जाणवू लागली. श्वसनाचा त्रास जाणवू लागला, प्रचंड थकवा वाटायला लागला. मला पुढे चालवेना. माझी ही स्थिती लक्षात आल्यामुळे युनिट कमांडर लेफ्टनंट कर्नल रणजीत सिंग यांनी एका जवानाला माझ्या मदतीसाठी पाठवले. चार दिवसाचा पायी प्रवास करून (वातावरणाशी अनुकूलन) न झाल्यामुळे मला खूपच त्रास होत होता.

त्याच वेळी मला नियमितपणे प्राणायाम व योग करणारे माझे वडील आठवले. प्राणायाम करताना ते 'पूरक-कुंभक-रेचक' करीत असत. त्यामुळे हवेतील अधिकाधिक प्राणवायू शरीरात घेतला जातो असं ते म्हणत. मी पण लगेचच दिवसभर ती क्रिया करत राहिलो आणि दुसऱ्या दिवशी सकाळी विनासायास दहा पायऱ्या चढून कमांडरच्या टेन्टमध्ये नाश्त्यासाठी जाऊ शकलो. त्या उंचीवरही योग व प्राणायामसाधना माझ्या मदतीला धावून आली ती अशी.

तिथल्या अधिकाऱ्यांना याचं खूपच आश्चर्य वाटलं आणि त्यांनी त्यामागील रहस्य विचारलं. मी सविस्तर माहिती दिल्यावर त्यांच्या सूचनेनुसार दुसऱ्या दिवसापासून तिथं प्राणायाम व योगाचे प्रशिक्षण देण्यास मी सुरुवात केली. माझी निवास व्यवस्था ग्लेशियरवरीलच एका टेन्टमध्ये केली होती. झोपण्यासाठी, तीन बाय सहा फुटाचा बर्फाच्या कठ्ठ्यावर प्लायवूड, वापरलेले पॅराशूट आणि स्लीपिंग बॅग टाकून बेड म्हणून तयार केला होता.

राखी पौर्णिमेच्या दिवशी मी सर्वांना राखी बांधली आणि त्याचे कारण विचारल्यावर संघाची त्यामागील भूमिका सांगितली. त्या घटनेनंतर त्यांचे माझ्या बरोबर वेगळेच नाते निर्माण झाल्याचा मी अनुभव घेतला. युनिटमध्ये सर्व ऑफिसर्स, जेसीओज आणि जवान यांच्या संगतीत निवास आणि घेतलेले मिशन तीन आठवडे अतिशय व्यवस्थितपणे चालू होते. अखेर १५ ऑगस्टला तिथं ध्वजवंदन होणार होतं. सर्व युनिट सज्ज झालं होतं. सगळे जमले आणि कर्नल रणजीत सिंग यांनी ''काणे साब, आज तिरंगा आप फैरायेंगे'' अशी विनंती करत मला आश्चर्याचा धक्का दिला. मी त्यांना, आपण कमांडर असल्यामुळे आपला तो अधिकार असल्याचे सांगितल्यावर, त्यावर त्यांनी ''आपने मेरे जवानों के लिए इतने कष्ट और परिश्रम लिये है, आप तो हमारे मेहमान है'' असं म्हणत माझ्याच हस्ते ध्वजारोहण केलं. मी भारावून गेलो.



काणे यांना मिळालेले सियाचिन मेडल



सन्मानाने दिलेले रिकामे कार्टीज

ध्वजारोहण झाल्यावर त्या बर्फाच्या नदीवर जेथे श्वास घेण्यासाठी सुद्धा त्रास होतो अशा अठरा हजार फूट उंचीवर जवानांचा व्हॉलीबॉलचा सामना झाला. त्याची बक्षीसं वाटण्याचा सन्मानही मलाच देण्यात आला. माझ्याच हस्ते ती वाटण्यात आली आणि त्यानंतर आयुष्यात सुवर्ण अक्षरांनी लिहून ठेवावी अशी घटना घडली. 'चलो काणे साब, आपको एक सिक्रेट चीज दिखाते है', असं म्हणत त्यांनी सुभेदार मेजरना खुणेने काही तरी सांगितलं. त्यांच्यापाठोपाठ आम्ही चार-पाच जण निघालो. मी इथे एक महिन्यापेक्षा अधिक काळ राहतो आहे, युनिटमधल्या सर्व गोष्टी मला माहीत आहेत. हे नवीन आता काय दाखवणार? असं मला वाटत होतं.

काही अंतर गेल्यावर आम्ही थांबलो. रणजीत सिंग साहेबांनी आज्ञा केली आणि आणि काही क्षणात मला एक आश्चर्याचा धक्का बसणारी गोष्ट घडली. आमच्यापासून दहा फुटावर एक वर्तुळाकार बर्फाचा तुकडा जमिनीपासून वर वर येऊ लागला आणि काही क्षणातच बर्फाच्या खालून एक गन वर आली. माझा माझ्या डोळ्यांवर विश्वास बसेना. लष्करात एखादी वस्तु किंवा तुमचं ठाणं लपवून ठेवण्यासाठी केमोफ्लाज करतात हे एनसीसीमध्ये अनुभवलं होतं. त्याचं प्रत्यक्ष दर्शन झालं.

सुभेदार साहेबांनी गन सेट केली आणि सर्व ओके असल्याचा रिपोर्ट दिला. आता दुसरा चमत्कार घडला. रणजीत सिंग साहेबांनी मला गनच्या सीटवर बसवून एकप्रकारे माझा सन्मान केला. १४ ऑगस्टला पाकिस्तानने त्यांच्या स्वातंत्र्यदिनाच्या दिवशी कारगिलकडून आपल्या दिशेने फायर केले होते. त्याला प्रत्युत्तर म्हणून आज जवानांनी भारताच्या शक्तीची झलक पाकिस्तानला दाखविण्यासाठी या गनने फायर केलं. या प्रसंगाची आठवण म्हणून फायर केलेल्या कार्टीजपैकी एक रिकामे कार्टीज रणजीत सिंग साहेबांनी '५ गार्ड रेजिमेंट'ची प्रेमाची आठवण म्हणून मला भेट दिली. त्यासोबत ते बाळगण्याविषयीचे अधिकारपत्रही होते.

आयुष्यात मला मिळालेला तो अत्युच्च सन्मान होता. माझं मिशन पूर्ण करून सुमारे अडीच महिन्यांनंतर मी त्या सर्वांचा निरोप घेऊन पुण्यात परत आलो. आश्चर्य म्हणजे काही दिवसातच सियाचीन ग्लेशियरवर केलेला निवास आणि पूर्ण केलेले मिशन यासाठी, सर्वसाधारणपणे तिन्ही संरक्षण दलांच्या लोकांना मिळणारे 'सियाचीन मेडल' आमच्या टीममधील प्रत्येकाला देऊन त्यांना सन्मानीत केल्याचे आर्मी हेडक्वार्टरचे पत्र मला मिळाले. त्यासोबत सियाचीन मेडलही पाठविले होते. आमचे डायरेक्टर मेजर जनरल एन. आय. के. मूर्ती यांच्या हातून एका विशेष कार्यक्रमात ते मेडल छातीवर लावून घेताना आयुष्य सार्थकी लागलेल्या भावनेनं आणि अभिमानानं उर भरून आला.

आजही २६ जानेवारी आणि १५ ऑगस्टच्या ध्वजारोहणला जाताना ते मेडल मी अभिमानाने छातीवर लावतो. देशसेवेचं हे ब्रीद लहानपणापासून शाखेत झालेल्या संस्कारातच आहे हे मात्र निश्चित!

(शब्दांकन – भगवान दातार)